चला स्विमिंग ला...
स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

संत राजिन्दर सिंह जी महाराज
यांच्या पावन सानिध्यात
मंगळवार, मार्च, 31/2026
संगत दर्शन - सायं 7 वाजता
बुधवार, एप्रिल, 1/2026
सत्संग - सायं 7 वाजता
नामदान (दिक्षा) - रात्री 9 वाजता
मिस्कीन मळा, गंगा उद्यान शेजारी, मिस्कीन नगर, सावेडी. अहिल्यानगर - 414003
7071050505/9067894213
www.sos.org

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ३०.०३.२०२६ | अंक नं. २९८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

समता पतसंस्था
नो रिस्क, रिटर्न्स फिक्स
११००+ कोटींच्या ठेवी
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
संपर्क : ७७२२ ०१० २२२
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
२०१ भाग्यवंत ओढतील चक्र
FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंग | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
फॅन्सी पायलच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन उपलब्ध

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

## एलपीजी 'गो गॅस'ची तिपटीने झाली वाढ; रिक्षाचालकांनी केला मोर्चा काढून निषेध

**४२ वरुन १०७ रुपयांपर्यंत पोहोचले दर; तासाला दरवाढ; जगायचे कसे? पूर्वीचे दर लागू करा : प्रशासनाला साकडे**

नगर - रिक्षामध्ये भरण्यासाठी वापरण्यात येणारा एलपीजी गॅसची मनमानी पद्धतीने दर तासाला भाडेवाढ सुरु असून, ४२ रुपयांवरुन हे दर आता १०७ रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. या गॅसच्या किमतीत काही महिन्यातच जवळपास तीनपटीने वाढ झाली आहे. सध्या या टंचाईच्या काळात दर तासाला गॅस भाववाढ सुरु असून, यामुळे रिक्षाचालकांनी उदरनिर्वाह करायचा कसा, असा प्रश्न उपस्थित करीत रिक्षाचालकांनी या दरवाढीबाबत प्रशासनाने तोडगा काढावा, असे साकडे घातले आहे.



रिक्षामध्ये भरण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या एलपीजी गॅसची झालेली दरवाढ रद्द करावी यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांना अहमदनगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने निवेदन देऊन चर्चा करताना अविनाश घुले, विलास कराळे, दत्ता वामन, अशोक औशीकर, नासीर खान, सुधाकर साळवे आदी.

अहिल्यानगर जिल्हा ॲटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेचे जिल्हाध्यक्ष व नगरसेवक अविनाश घुले यांच्या नेतृत्वाखाली रिक्षाचालकांनी ३० मार्च रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांची भेट घेतली. त्यांना निवेदन देत एलपीजी गॅस पंप मालकांकडून मनमानी पद्धतीने गॅसच्या किमती वाढविल्या जात असल्याचा आरोप रिक्षा चालकांनी केला. यामध्ये प्रशासनाने लक्ष घालून ही दरवाढ रद्द करावी, अशी मागणी करीत तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी घुले यांनी दिला. दरम्यान १ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात ११ वाजता एलपीजी कंपन्या व रिक्षा चालक संघटनेचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन जिल्हा पुरवठा अधिकारी बडे यांनी रिक्षा चालक संघटनेला दिले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी विलास कराळे, दत्ता वामन, अशोक औशीकर, नासीर खान, सुधाकर साळवे, जुनेद बागवान, गणेश आटोळे यांच्यासह २०० रिक्षाचालक उपस्थित होते.

शहरात जवळपास ९० टक्के रिक्षा एलपीजी गॅसवर चालतात तर केवळ १० टक्के रिक्षा सीएनजी गॅसवर चालतात. एलपीजी गॅस पुरवठा करणारे माळीवाडा बस स्टँडजवळ एक पंप आणि दुसरा बोल्हेगाव पुलाजवळ असे दोनच पंप नगर शहरात आहेत. हे दोन्ही पंप गो गॅस कंपनीचे आहेत. ही कंपनी पूर्णपणे खासगी आहे. त्यामुळे या कंपनीच्या भाववाढीवर शासनाचे नियंत्रण नाही. पण कंपनीने मनमानी पद्धतीने भाववाढ सुरु केली आहे, अशी तक्रार रिक्षा चालकांनी पुरवठा विभागाकडे केली.

रिक्षाचालकांनी प्रवासी भाडे वाढविले तर प्रवासी भाडे वाढवून द्यायला तयार नसतात. अशा परिस्थितीत एलपीजी गॅस पंपांकडून रिक्षा चालकांची होणारी लूट थांबवावी आणि झालेली दरवाढ तात्काळ रद्द करण्यात यावी, पंप चालकांकडून प्रत्येक तासाला गॅसचे भाव वाढविण्यात येतात, हा रिक्षा चालकांवर अन्याय आहे. ही दरवाढ शासन नियंत्रित असावी, अशी मागणी करीत दोन-तीन दिवसात निर्णय न झाल्यास संपूर्ण नगर शहरातील सर्व रिक्षावाले आहेत उग्र स्वरूपाचे आंदोलन करू, असा इशारा अहमदनगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

### पुरवठ्याअभावी छत्रपती संभाजीनगरला ६ गॅस पंप बंद

या इंधन टंचाईमुळे तीन दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगर शहरातील १४ ऑटोगॅस फ्युएल सेंटरपैकी सहा सेंटर बंद करण्यात आली होती. मिलकॉर्नर येथील ऑटोगॅस सेंटरही शनिवारी गॅस पुरवठा वेळेत न झाल्याने बंद करण्यात आले. ऑटोगॅसचाही तुटवडा सुरु झाल्याने पंप बंद होत आहेत. दरम्यान अहिल्यानगर शहरात पूर्वी चार गॅसपंप होते. परंतु त्यातील दोन पंप दीड वर्षापूर्वीच बंद झाले आहेत. तर आता केवळ दोनच पंप सुरु आहेत. तेथेही गॅसची दरवाढ मोठ्या प्रमाणात सुरु आहे, अशी माहिती कराळे यांनी दिली.

## शेअर बाजारातील सेन्सेक्स १००० तर निफ्टीही ३०० अंकांनी घसरला

मुंबई - भारतीय शेअर बाजार मागील एका महिन्यापासून घसरणपंथीला आला आहे. इराण आणि अमेरिका-इस्रायलमध्ये एका महिन्यापासून जोरदार हल्ले-प्रतिहल्ले केले जात असून मध्यपूर्वेतील या देशांमधील संघर्षाची झळ भारत आणि जगभरातील शेअर बाजारांना बसत आहे. ३० मार्च रोजी भारतीय शेअर मार्केटने आठवड्याची सुरुवातच मोठ्या घसरणीसह केली आहे.

आठवड्याच्या सुरुवातीच्या व्यापार दिवशी गुंतवणूकदारांना अपेक्षित अशीच बाजरीची सुरुवात, पण काहीशी मर्यादित झाली. प्री-ओपनिंगला मुंबई शेअर बाजार तब्बल १०१८ अंक किंवा १.३८ टक्के घसरणीसह उघडला तर निफ्टी निर्देशांक तब्बल २६९.९५ अंक किंवा १.१८% घसरणीसह ट्रेड करत होता. निफ्टीमध्ये ॲक्सिस बँक, कोटक महिंद्रा बँक, श्रीराम फायनान्स, स्टेट बँक ऑफ इंडिया यांसारखे शेअर्स सर्वाधिक घसरले, तर हिंडाल्को इंडस्ट्रीज आणि ओएनजीसी सर्वाधिक वाढले आहेत.

## महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन स्थगित; पगार होणार जमा, आयुक्तांच्या चर्चेतून निघाला तोडगा

नगर - महापालिका कर्मचाऱ्यांनी २७ मार्च पासून सुरु केलेले काम बंद आंदोलन ३० मार्च रोजी आयुक्तांशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर स्थगित करण्याचा निर्णय कामगार युनियनने घोषित केला. दरम्यान काही कर्मचाऱ्यांचे पगार आज तातडीने तर काही कर्मचाऱ्यांचे पगार दोन दिवसात करण्यात येतील, असे आश्वासन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी दिले असल्याची माहिती कामगार युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल यांनी दिली.

महापालिका कर्मचाऱ्यांचे पगार दोन महिन्यांपासून रखडले होते. सध्या मार्चएण्ड असल्यामुळे कर्जाचे हप्ते आणि मुलांच्या शाळांचे शुल्क भरणे आवश्यक होते. अशा परिस्थिती पगार न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांसमोर मोठी अडचण निर्माण झाली होती. याबाबत कर्मचारी युनियनने वारंवार प्रशासनाशी चर्चा करुन महापालिकेच्या खात्यातून पगार करण्याची विनंती केली होती. मात्र, आयुक्तांनी त्यास मंजुरी दिली नव्हती. अखेर स्थायी समितीच्या सभेत यावर चर्चा झाल्यानंतर सभापती सुभाष लोंढे यांनी महापालिका प्रशासनाला कर्मचाऱ्यांचे पगार तातडीने करावेत, असे निर्देश दिले. त्यानंतर ३० मार्च रोजी आयुक्त डांगे यांनी युनियन प्रतिनिधींशी चर्चा करुन आंदोलन मागे घेण्याची विनंती करीत पगार जमा करण्याबाबत सकारात्मक चर्चा केली. याबाबत आयुक्त डांगे यांनी वरिष्ठांचे मार्गदर्शन तातडीने कर्मचाऱ्यांचे पगार जमा करण्याची तयारी दर्शविली. आज काही कर्मचाऱ्यांचे तर पुढील दोन उर्वरित कर्मचाऱ्यांचे पगार जमा केले जातील, असे आश्वासन आयुक्त डांगे यांनी युनियनच्या शिष्टमंडळाला दिले. त्यानंतर युनियन हे काम बंद आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला. दोन-तीन दिवस वाट पाहून पगार न झाल्यास सर्व कर्मचारी पुन्हा काम बंद आंदोलन सुरु करतील, असा इशारा कामगार युनियनच्यावतीने देण्यात आला आहे.

डॉ. अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

१३वे पुण्यस्मरण
स्व. लक्ष्मणराव नारायण कोतकर
स्व. दि. ३१/०३/२०१३
आपली नम्रता, सेवाभाव, प्रेमळपणा, व शिस्तप्रिय जीवन सदैव आठवणीत राहील. ..
आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली.
* दु:खांकित *
राजेंद्र लक्ष्मणराव कोतकर (मुलगा)
अनिकेत राजेंद्र कोतकर (नातु)
समस्त कोतकर परिवार
केडगांव, अहिल्यानगर

CCTV CAMERA बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

# गृहिणी

## आरोग्य

### या प्रकारची वेलची का खावी?

सामान्यतः बोलायचे झाल्यास हिरवी वेलची (छोटी/हिरवी इलायची) ची तासीर थंड मानली जाते. आयुर्वेदानुसार शीत असणारी वेलची पित्त दोष शांत करते, पोटातील उष्णता/ॲसिडिटी कमी करते आणि शरीराला थंडावा देते. म्हणूनच उन्हाळ्यात वेलचीचे सरबत किंवा पाणी पचनासाठी आणि थंडावा देण्यासाठी खूप वापरले जाते. हिरवी वेलची शरीरासाठी थंड असते, जी पोटातील उष्णता कमी करण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करते याउलट काळी वेलची गुणाने उष्ण असते, जी सहसा स्वयंपाकात गरम मसाला म्हणून वापरली जाते. हिरवी वेलची थंड आणि काळी/मोठी वेलची उष्ण असे स्पष्ट केले जाते. तुम्ही रोजच्या वापरात जी हिरवी वेलची (चहा, मिठाई, मुखवासात) घेता, ती थंडच आहे. सामान्य निरोगी व्यक्तीसाठी दिवसातून २ ते ३ वेलची (किंवा १-२ दाणे सकाळी आणि १-२ संध्याकाळी/रात्री) खाणे पुरेसे आणि सुरक्षित आहे. जेवणानंतर १-२ वेलची चघळून खाल्ल्यास पचन चांगले होते, तोंडाचा वास दूर होतो आणि गॅस/ॲसिडिटी कमी होते. अनेक आयुर्वेदिक/हेल्थ एक्सपर्ट्स रोज २ वेलची (विशेषतः रात्री झोपण्यापूर्वी) १५ दिवस खाण्याची शिफारस करतात याने पचन, झोप आणि तोंडाची स्वच्छता होते

## पाककला

### रुचकर केळीचा हलवा

**साहित्य** – केळी ४ पिकलेली, तूप २ चमचे, साखर १/२ कप, दूध १/२ कप, काजू १० ते १२, बदाम १० ते १२, मनुका २ चमचे, वेलची पूड १/२ चमचा, नारळ १/४ कप किसलेले, सजावटीसाठी पिस्ता आणि चारोळी

**कृती** – केळीच हलवा बनवण्यासाठी सर्वात आधी एका बाऊलमध्ये केळाचे साल काढून ते मॅश करून घ्यावे. केळे जेवढे पिकलेले असतील तेवढा हलवा रुचकर होईल. आता एका मोठ्या कढईमध्ये दोन मोठे चमचे तूप घालावे. तूप गरम झाल्यानंतर त्यामध्ये काजू, बदाम आणि मनुका घालाव्या. तसेच हे परतवून घ्यावे. आता यामध्ये मॅश केलेले केळे घालावे व मिक्स करावे. यामुळे चव रुचकर लागेल. आता यामध्ये साखर घालावी. साखर विरघळल्यानंतर दूध घालावे. तसेच आता हलव्यामध्ये वेलची पूड आणि किसलेले नारळ घालावे. नारळाचा किस हलव्याची चव वाढवेल. हा हलवा मध्यम गॅस वर ठेऊन हलवत राहावा. जेव्हा हलवा तूप सोडायला लागेल तेव्हा गॅस वरून खाली काढून ठेवा. तयार हलवा बाऊलमध्ये काढून त्यावर पिस्ता, चारोळी, सुकामेवा घालून सजवा.

## वास्तू

### फर्निचरच्या दुकानासाठी

* फर्निचरच्या दुकानांचे तोंड दक्षिणेकडे असले पाहिजे कारण यामुळे तुमच्या ब्रँडची प्रसिद्धी होईल. प्रसिद्धी आणि नाव तुम्हाला एकनिष्ठ ग्राहकांना आकर्षित करण्यास सक्षम करेल.

* दुकानासाठी वास्तुशास्त्रानुसार मूर्तींची दिशा ईशान्य असावी जेणेकरून तुम्हाला आध्यात्मिक समाधान मिळेल. दिवसाची सुरुवात प्रार्थनेने केली पाहिजे आणि सौम्य अगरबत्ती लावावी.

## सौंदर्य

चेहऱ्यावरील मृत पेशींना काढून टाकण्यासाठी आठवड्यातून दोन वेळा स्क्रबिंग करावे. नियमितपणे स्क्रबिंग केल्यामुळे रक्त प्रवाह वाढतो.

## सल्ला

काकडी कापण्यापूर्वी त्याचा शेंडा कापून थोडा घासून घ्यावा, जेणेकरून कडूपणा निघून जाईल. जर काकडी कोवळी असेल, तर सालीसकट खावी; कारण साले फायबरने समृद्ध असतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६**

**महावीर जयंती, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, पूर्वा १५|२१, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : शत्रुपक्ष हावी राहील. एखाद्या चुकीला पुन्हा करु नका. मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल.

**वृषभ** : आरोग्यात सुधारणा. आर्थिक स्थितीत बचत आणि निवेशाचे योग येतील. लाभदायी करार होतील.

**मिथुन** : आर्थिक आणि सामाजिक कामांमध्ये अडथळे. कामांची गती मंदावेल. शांत रहा. लाभदायक बातमी कळेल.

**कर्क** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. आपल्या महत्वाकांक्षेमुळे यश मिळू शकेल.

**सिंह** : आपली स्थिति, वास्तविकता वाढेल. पारिवारिकदृष्ट्या वेळ सामान्य. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**कन्या** : उत्साह, आत्मविश्वास वाढेल. अडकलेला पैसा मिळेल. खासगी कामाकडे जास्त लक्ष द्याल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. अध्ययनात छान यश.

**तूळ** : अडकलेला पैसा मिळेल. अस्तिक लोकांसाठी शुभ. गैरसमज दूर होतील. व्यर्थ ताण जाणवेल. जबाबदारीची कामे पडतील.

**वृश्चिक** : आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. आपल्या बुद्धि आणि तर्कांने कार्यात यशाची शक्यता.

**धनु** : आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. वाहने व यंत्रे जपून चालवावीत.

**मकर** : पाठबळ मिळेल. मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल.

**कुंभ** : आपली दूरदृष्टि आणि बुद्धिने अडकलेली कामे पूर्ण होतील. सामाजिक यश. नवीन कार्य सुरू करू नका.


**मीन** : काळजीपूर्वक काम करा. कोणतेही काम एखाद्यावर विसंबून राहून करू नका. आरोग्य नरम-गरम राहील.

## शब्दगंध क्र. ७३९८ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) दुर्लौकिक प्राप्त झालेला; अपकीर्ती लाभलेला ५) पिकांवर पडणारा एक रोग ८) अगदी गोल; वाटोळा १०) दिराची बायको ११) खाण; साठा; गोदाम; डेपो १३) दिवा लावण्याचा धातूचा स्तंभ; ठाणवई १५) नंतर; पुन्हा १६) घडण; नकली; रचना १८) पाणी भरण्याचे मातीचे मोठे भांडे किंवा डेरा १९) तपास; शोध; पत्ता २०) मराठी कॉम्प्युटर २२) झणझणीत; खणखणीत; तीव्र

शब्दगंध क्र. ७३९७ चे उत्तर



**उभे शब्द :-** १) काख २) प्रत्येक; भाव; हर; किंमत ३) एक विषारी साप ४) एक देवता ६) परवानगीने काढलेली सुट्टी ७) पायी जाण्याचा रस्ता ९) टिकाव १२) जीभ; जिव्हा; एक पेय १३) लढाईचे मैदान; रणभूमी; रणांगण १४) फळातील रसाळ भाग; गर १७) शिजलेल्या डाळीचे एक प्रकारचे कालवण; आमटी १९) महिना; माह २०) प्रपंचाविषयीचे आकर्षण सोडून ईश्वरभजनी लागलेली व्यक्ती २१) श्रम; मेहनत

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : कसे बोलावे ही कला आहे पण कसे बोलू नये हा संस्कार आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### चहा कोणी शोधला, पहिल्यांदा चहा कोण पिला?

जगात चहाप्रेमींची कमतरता नाही. पाण्यानंतर चहा हे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक सेवन केले जाणारे पेय आहे. भारतात, लोकांचा दिवस चहाच्या कपने सुरू होतो. बऱ्याच लोकांना चहाशिवाय दिवस अपूर्ण वाटतो. जेवणापूर्वी असो वा नंतर, लोक कधीही चहा नाकारत नाहीत. चहाचा इतिहास खूप मनोरंजक आहे. चहा कोणी शोधला हे तुम्हाला माहिती आहे का? चीन ते भारत आणि युरोप पर्यंत चहाचा प्रवास जाणून घ्या.

पहिल्यांदा चहा कोणी बनवला?

चहाचा इतिहास खूप रंजक आहे. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की चहा पहिल्यांदा चुकून बनवला गेला होता आणि तो भारतात नाही तर दुसऱ्या देशात बनवला गेला होता. चहाचा जन्म चीनमध्ये झाला. म्हणजे तिथे चहाची पाने वाढायची. इ.स.पू. २७३२ मध्ये चीनमध्ये कोणीतरी पहिल्यांदा चहा प्यायला. हो, चहाचा शोध चिनी सम्राट शेन नुंग यांनी लावला होता. ज्याने जगाला चहाची ओळख करून दिली. पहिल्यांदाच चहा अशा प्रकारे बनवला गेला

असे म्हटले जाते की सम्राट शेन नुंगच्या राजवाड्याजवळ चहाचे बाग होते. तो चहाची पाने खात असे. एके दिवशी, स्वयंपाकघरात ठेवलेली चहाची पाने चुकून उकळत्या पाण्यात पडली. अचानक पाण्याचा रंग बदलला. सम्राट शेन नुंग उत्सुक झाले. जेव्हा त्याने ते चाखले तेव्हा तो स्तब्ध झाला. सम्राट शेन नुंगने तो दररोज पिण्यास सुरुवात केली. सम्राट शेन नुंग यांनी या पेयाला चा असे नाव दिले. हळूहळू त्याने त्याच्या जवळच्यांना याची जाणीव करून दिली. एक वेळ अशी आली की हा चहा सर्वांचा आवडता बनला. नंतर ते चहा म्हणून ओळखले जाऊ लागले.

चीननंतर युरोपमध्ये चहाची आयात

इ.स. १६१० मध्ये पोर्तुगीज आणि डच लोकांनी प्रथम युरोपमध्ये चहा आयात केला. १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंत चहा फक्त पानांच्या स्वरूपात उपलब्ध होता. चहा पाण्यात उकळून तयार केला जात असे पण आता तो अनेक स्वरूपात उपलब्ध आहे.

भारतात चहाचे उत्पादन

व्यापार वाढत असताना, चहाची पाने जपण्याचा एक मार्ग देखील शोधला गेला. पोर्तुगीजांनी भारतात चहा आणला होता पण आता असे दिसते की चहाचा उगम इथेच झाला आहे कारण भारतीय खूप चहा पितात.

### खोडकर मासा

एकेकाळी एका जंगलात एक मासा राहत होता. तो खोडकर होता. नेहमी काहीतरी खोडकरपणा करत असे. एके दिवशी तो आईकडे गेला आणि म्हणाला, आई, आपण तलावात येऊन खूप दिवस झाले आहे. चल, आई, बाहेर मला खेळायला जायचे आहे. मास्याचे बोलणे ऐकून आई म्हणाली, नाही, आता नाही. बाहेर शिकारी आहे. आपण रात्री जाऊ, जेव्हा कोणीही आसपास नसेल. मग तू मनापासून खेळू शकतेस. मग मास्याने विचारले, आई, हे शिकारी कोण आहे? आणि त्यांच्यामुळे आपण बाहेर का जाऊ शकत नाही? आधी मला ते सांग. मग आई म्हणाली, बेटा, शिकारी असे असतात जे आपल्यासारख्या प्राण्यांना पकडतात आणि जर आपण बाहेर गेलो तर ते आपल्याला त्यांच्या जाळ्यात पकडतील. मग आपण सर्व एकमेकांपासून वेगळे होऊ. समजून घे, पण मासा आईचे ऐकत नाही.

मासा बाहेर जाऊन खेळण्याचा आग्रह धरतो पण आता आई दिसत नाही हे पाहताच तो तलावाच्या माथ्यावर पोहोचतो. माथ्यावर पोहोचताच त्याला उघडे निळे आकाश दिसते, पक्ष्यांचा गोड किलबिलाट ऐकू येतो आणि मंद थंड वारा वाहतो. हे सर्व पाहून मास्याचे हृदय आनंदाने भरून येते. जोरात हसत आणि हसत ती पाण्यावर खेळू लागते. मासा पुढे जाण्याचा प्रयत्न करतो, पण तो हालू शकत नाही. त्याला संपूर्ण शरीर बांधलेले वाटते. मग त्याला एक आवाज ऐकू येतो, वाह, आज मजा आली! मी पहिल्याच प्रयत्नात इतका चांगला मासा पकडला. असे म्हणत शिकारी जाळे स्वतःकडे ओढू लागतो.

मासा म्हणतो, भाऊ, मला पाण्यातून बाहेर काढू नकोस. जर मी बाहेर पडलो तर मी कसा वाचेन? शिकारी म्हणतो, माफ करा, मी काही करू शकत नाही. मी एक शिकारी आहे आणि मला मासे हवे आहे.

शिकारीचे हे ऐकून, मासा म्हणतो, बरं, जर मी तुला खूप जास्त मासे दिले तर काय होईल? शिकारी लगेच जाळे थोडे सैल करतो आणि विचारतो, ते कसे? मासा उत्तर देते, माझे खूप मित्र आहे. मी जाऊन त्यांनाही घेऊन येईन.

शिकारी उत्तर देतो, हे खरंच खरं आहे का? तू जाळ्यातून बाहेर पडण्यासाठी असे म्हणत नाहीस. मासा उत्तर देते, आता तुला एक मासा हवा आहे की खूप ते तुझी निवड आहे. हे ऐकून, शिकारी लगेच जाळे काढून टाकतो आणि मास्याला सांगतो, ठीक आहे, लवकर जा आणि सर्वांना घेऊन ये. मी इथे तुझी वाट पाहत आहे.

जाळे सोडताच, मासा आजूबाजूला पाहत नाही, तर थेट त्याच्या आईकडे जातो. मासा आईला घट्ट मिठी मारतो आणि म्हणतो, आई, तू खूप छान आहेस. आता मी तू जे काही सांगशील ते सर्व मी ऐकेन. अश्या प्रकारे मासा शिकारीच्या तावडीतून सुटतो.

तात्पर्य : नेहमी आपल्या पालकांच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे.

## जीवन का अमृत (भाग १)



### आहार

१. यह अच्छा है कि आप खाने-पीने का पूरा परहेज रख रहे हैं, जो कि बुनियादी जरूरतों में से एक है। आप सहमत होंगे कि मन की शुद्धता हासिल करने के लिए, हमें शुद्ध शाकाहारी, सादा और पोषक आहार लेने की जरूरत है, ताकि यह जिस्म ठीक तरह से काम करता रहे।

अब दयालु सत्गुरु अंतर में आपका सदा का साथी है और आप अपने सच्चे प्रयत्नों और विनम्र समर्पण से उसे, यानि उसके नूरी स्वरूप को अपने अंतर में देखने लगेंगे ।

२. यह खुशी की बात है कि आपकी सेहत सुधर रही है और आपने अपना वज़न कुछ कम कर लिया है। फलों और सब्जियों का सही सम्मिश्रण और साथ ही साथ हल्की शारीरिक कसरतें आपको एक छरहरा और फुर्तीला डील-डौल बनाने में सहायक होनी चाहिएँ ।

३. जहाँ तक बताए गए भोजन में ढील का प्रश्न है, मैं हर एक जिज्ञासु से, जो इस रास्ते पर है, कहना चाहता हूँ कि जब तक हम इस भौतिक शरीर में हैं, शाकाहारी भोजन का कड़ाई से पालन होना चाहिए। खान-पान में

कोई भी ढील केवल भजन-सिमरन में ही पक्की बाधा नहीं बनेगी, बल्कि बिना बात ही कर्मों का भार भी बढ़ाएगी। हमारा लक्ष्य है, हर संभव तरीके का प्रयोग करना, ताकि अंतर में प्रभु तक चढ़ाई की जा सके

४. यह ग्रहणी का नैतिक कर्तव्य है कि वह, अपने दिल में प्रभु की मधुर याद लिए, शुद्ध भोजन तैयार करे ।

इस प्रकार से पकाया गया भोजन, जिसमें कि मन प्रभु प्रियतम से जुड़ा हो और हाथ कार्य में लगे हो, स्वर्ग का दिव्य अन्न बन जाता है और जो भी उसे खाता है, धन्य हो जाता है ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### एक ध्येय

असताना आपण स्वत:ची काळजी घेत नाही. कामाच्या ठिकाणी ध्येयं पूर्ण करताना जर आपण आपल्या तब्येतीकडे दुर्लक्ष केलं मी जर म्हणाले की मी कामात एवढी व्यग्र होते की मला खायला, झोपायला किंवा व्यायामाला वेळच मिळाला नाही. अशाने माझं शारीरिक स्वास्थ्य बिघडणार नाही का ? शेवटी ध्येय गाठलं जाईल पण त्याचबरोबर मी आजारीही पडू शकते. तसंच, आपण जर आपल्या मानसिक स्वास्थ्याची काळजी घेतली नाही, खूप रागराग केला, इतरांबद्दल मत्सर, स्पर्धा, तणाव, चिंता आणि द्वेषभावना यांनाच धरून ठेवलं तर भलेही व्यावसायिक पातळीवर आपण वरच्या पदावर जाऊ; पण आपली शक्ती एवढी कमी होईल की आपण चांगली नाती गमावून बसू.

सुरेश ओबेरॉय : कोणती शक्ती कमी होईल ?

शिवानीदीदी : आत्म्याची शक्ती कमी होईल. जेव्हा आपण चिडतो किंवा उदास होतो, एखाद्याचा तिरस्कार करायला लागतो किंवा सतत नकारात्मक आठवणींना उजाळा देतो आणि त्याच त्या भावना सातत्याने पुन्हा जगायला लागतो तेव्हा आपली मानसिक अवस्था कशी होईल? आपलं मन आपल्या सहज भावात्मक अवस्थेपासून दूर जाईल. एका दिवसात जर आत्मा त्याच्या सहज अवस्थेपासून अनेकदा दूर गेला तर तो कमकुवत होतो. जसजशी त्याची प्रतिकारशक्ती कमी होत जाते, तसा तो कमकुवत आत्मा पूर्वीची नाती जपू शकत नाही.

हे आपल्या शरीराच्या प्रतिकार शक्तीसारखं आहे. ती कमकुवत झाली की, हवामानातला किंवा जेवणातला छोटासा बदलही आपल्याला आजारी पाडू शकतो. आपण सारखेसारखे आजारी पडू लागतो.

सुरेश ओबेरॉय : हा मनाचा आजार आहे का?

शिवानीदीदी : हे आत्म्याविषयी आहे, जो प्रत्येक विचार आणि भावना निर्माण करतो. हा आत्मा म्हणजे झाडाचं बी आहे. हे झाड आपली नाती, आपलं काम आणि आपलं यश यांचं प्रतिनिधित्व करतं. मूळ बीज कमकुवत होत असताना आज आपला बराच वेळ या झाडाची काळजी घेण्यात जातो. आता या बीजाची काळजी घेण्याची वेळ आहे. जोवर आपण हे बीज निरोगी बनवत नाही तोवर झाड बहरू शकत नाही.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलीचे वडील : तू काय शिकला आहेस? मुलगा : एमएफआयएएस

मुलीच्या कुटुंबाने या पदवीबद्दल विचारले नाही, कारण मुलाचे कुटुंब त्यांना अशिक्षित समजेल अशी भीती होती... नंतर त्यांचे लग्न होते...

लग्नानंतर, मुलीने मुलाला विचारले : ही एमएफ आयएएस पदवी कोणती आहे...?

मुलगा : मॅट्रिक फेल इन ऑल सब्जेक्टस्

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतातील पहिली सौर ऊर्जा सक्षम रेल्वे कोणत्या रेल्वे स्थानका दरम्यान धावणार आहे? सराई रोहिल्ला ते करु खनगर (हरियाणा)

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

म्हणून पपई ही अति रक्तदाब, हृदयविकार यामध्ये उपयुक्त आहे. बालकांच्या आहारात नियमितपणे रोज दोन फोडी पपई दिल्यास त्यांचे शरीर सुदृढ होऊन उंची चांगली वाढते. नियमितपणे पपई सेवनाने यकृतवृद्धी व प्लीहेचे विकार कमी होतात.

सावधानता : गर्भवती स्त्रीने कच्ची किंवा पिकलेली पपई अति प्रमाणात खाऊ नये. त्यामध्ये ङ्कअङ्क जीवनसत्त्व असते म्हणून खायचीच असेल, तर अगदी क्वचितच एखादी फोड खावी. तसेच ज्या स्त्रियांना मासिक स्राव जास्त प्रमाणात होतो, त्यांनीही पपई अति प्रमाणात खाऊ नये.

मुळव्याधीमधून जर रक्त पडत असेल, तर अशा वेळी पपई खाऊ नये.

### पेरू

----------

चकचकीत हिरवट पिवळसर रंगाचा पेरू हा दिसायला व आकाराने गोल चेंडूसारखा असतो. तर कभी लंबगोलही असतो. हे फळ मूळचे दक्षिण अमेरिकेतील असून, आज बहुतेक सर्वच देशांमध्ये आढळते. भारतातही पेरूची सर्वत्र लागवड केली जाते. मराठीत 'पेरू', हिंदीमध्ये 'अमरूद', संस्कृतमध्ये 'बहुबाज,

इंग्रजीमध्ये 'ग्वाव्हा ', तर शास्त्रीय भाषेत 'पॅसिडिअम गऊजवा' या नावाने परिचित आहे. सामान्यपणे पेरूच्या दोन जाती आहेत. एका जातीमध्ये पांढरा गर असतो, तर दुसऱ्या जातीमध्ये गुलाबी गर असतो. दोन्हीही जातींचा पेरू चवीने गोड व थोडासा तुरट असतो. पेरू ही वनस्पती मिरटेसी कुळातील आहे. औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार : पेरू हा मधुर रसात्मक, मधुर विपाकी व शीत वीर्यात्मक आहे. तसेच तो पित्तशामक व कफप्रकोपक आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : पेरूमध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह व 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. तसेच तंतुमय पदार्थ, खनिजे, प्रथिने, पिष्टमय पदार्थ व थोड्या प्रमाणात 'अ' व 'ब' जीवनसत्त्व असते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आनंदऋषीजी म.सा.च्या पुण्यतिथिदिनी संपूर्ण विश्वात १०८ करोड महामंत्रचा जाप





छत्रपती संभाजीनगर – जागतिक शांतता आणि मानवजातीच्या कल्याणासाठी सुरू असलेल्या '१००८ कोटी नवकार महामंत्र जपानुष्ठानाने' एक अभूतपूर्व ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. भाविकांच्या भक्ती आणि उत्साहामुळे आज अखेर प्रथम सत्रात १४ ते २९ मार्च पर्यत २१० कोटींहून अधिक नवकार मंत्रांचा जप पूर्ण झाला आहे. दुसऱ्या सत्रात या आध्यात्मिक महायज्ञाला आता अधिक व्यापक स्वरूप प्राप्त झाले असून २८ मार्च रोजी राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा च्या ३६ व्या पुण्यतिथि दिनी उपाध्याय प्रवर प्रवीणऋषीजी म.सा. यानी प्रत्येक आनंदभक्त परिवारास छत्तीस नवकार महामंत्रच्या माला फेरण्याचे व सकल जैन समाजास सामूहिक जाप करण्याचे आवाहन केले होते.

अहिल्यानगर येथे राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा. यांच्या मुख्य समाधीस्थळी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषीजी म.सा. यांच्यासह ५० पेक्षा अधिक साधु साध्वीजींच्या पावन सान्निध्यात दिवसभरात हजारो भक्तांनी सामूहिक नवकार जाप केला. या आवाहनाला देश विदेशातील लाखो जैन, अजैन गुरु आनंद भक्तांनी सहभाग घेत १०८ करोड नवकार मंत्राची भेट देत विनम्र वंदन नमन केले.

या नवकार यज्ञात गुरु आनंदभक्त परिवारातर्फे २०७ कोटि नवकार महामंत्रचा सहभाग देण्याचे आश्वासन उपाध्याय प्रवर प्रवीनऋषीजी म.सा. यांनी केले आहे.

आगामी ३१ मार्च रोजी भगवान महावीर जयंतीनिमित्त प्रत्येक व्यक्तीने ११ माळा जप करण्याचे विशेष आवाहन ग.अभयदेव सुरिश्वरजी महाराजा यांनी केले आहे.

या उपक्रमाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून, आतापर्यंत देशभरातील सुमारे ५ लाख कुटुंबे आणि २५ हजार साधू–साध्वीजींनी या जपानुष्ठानात सक्रिय सहभाग नोंदवला आहे. महावीर जयंतीच्या मुहूर्तावर ३०६ कोटी जपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा संकल्प संयोजकांनी केला आहे. गच्छाधिपती अभयदेवसुरीश्वरजी महाराजांच्या प्रेरणेने 'नवकार फाऊंडेशन' आणि 'जितो' छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने हे विश्वविक्रमी अभियान राबवले जात आहे.

३१ मार्च रोजी महावीर जयंतीचे औचित्य साधून प्रत्येक जैन बांधवाने आपल्या कुटुंबासह घरात किमान ११ माळा नवकार महामंत्राचा जप करावा. विशेष म्हणजे, केवळ जैन समाजच नव्हे, तर जागतिक शांततेची इच्छा ठेवणाऱ्या अजैन व्यक्ती आणि विविध सामाजिक संस्थांनीही या शांतता कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. 'नवकार करे बेडा पार' या श्रद्धेसह संपूर्ण विश्व सकारात्मक ऊर्जेने भारून टाकण्यासाठी हे 'हर घर नवकार' अभियान अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

### यंदाचा 'नवकार दिवस' राष्ट्रपतींच्या उपस्थितीत

यंदाच्या जपानुष्ठानाचे मुख्य आकर्षण म्हणजे ९ एप्रिल विश्व नवकार दिवस रोजी होणारा विशेष सोहळा. हा कार्यक्रम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत साजरा होणार आहे. राष्ट्रपतींच्या उपस्थितीत होणारा हा सामूहिक जप भारतीय संस्कृती आणि अहिंसेच्या जागतिक संदेशासाठी एक अभिमानास्पद क्षण ठरेल. भाविकांनी ९ एप्रिलच्या अभियानात सहभागी होऊन विश्वशांतीसाठी आपला खारीचा वाटा उचलावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## तुकाराम महाराज शेक्सपिअर

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ. रामचंद्र देखणे 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

दोन महासागर एकमेकांना येऊन भेटले तर एकमेकांशी ते काय बोलतील? दोन उत्तुंग शिखरे एकमेकांना आलिंगन देऊ लागली तर त्यांच्यात काय संवाद होईल ? हा अतिशय कुतूहलाचा आणि काहीसा आश्चर्याचा विषय ठरेल.

पर्वताला उंची आहे पण खोली नाही आणि सागराला खोली आहे पण उंची नाही. विचारतत्त्वाची खोली आणि प्रज्ञा–प्रतिभेची उंची लाभलेले दोन महासागर आणि दोन उत्तुंग पर्वत म्हणजे जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज आणि नाटककार विल्यम शेक्सपिअर. दोघांच्या वास्तव्याच्या भूमीत हजारो मैलांचे अंतर. दोघांच्या भाषा भिन्न. देश, प्रदेश भिन्न. भौगोलिक स्थितीही भिन्नच! पण या दोघांच्या भेटीचा हृद्य सोहळा घडविला आहे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य विंदा करंदीकरांनी.

एका कवितेतून विंदांनी त्यांच्या भेटीचे सुंदर रूपक उभे केले आहे. ही अलौकिक भेट नेमकी कुठे झाली ? विंदा म्हणतात,

**तुकोबांच्या भेटी शेक्सपिअर आला ।**
**तो झाला सोहळा। दुकानात ।।**

हा सोहळा एका दुकानात म्हणजे निवृत्तीच्या नव्हे तर शुद्ध प्रवृत्तीच्या अंगणात झाला. त्यावर तुकोबारायांनी शेक्सपिअरला म्हटले,

**तुका म्हणे विल्या । तुझे कर्म थोर ।**
**अवघाचि संसार । उभा केला ।**

तू तुझ्या प्रतिभासंपन्न नाटकांतून अवघाची संसार म्हणजे सारा लोकाचार, लोकवृत्ती, लोकभावना रंगमंचावर आणल्या. तुझे हे लेखनकर्म खरोखर थोर आहे पण एवढी नाटके लिहून शेक्सपिअर काहीसा अस्वस्थ आहे आणि त्या अस्वस्थेचे कारणही तो तुकोबारायांपाशी मनमोकळेपणे सांगतो आहे. तो म्हणतो, खरं सांगू –

**शेक्सपिअर म्हणे।एक ते राहिले ।**
**तुवा जे पाहिले । विटेवरी ।।**

विटेवर उभे असलेले 'परब्रह्म' आणि त्याच्या वर्णनासाठी अभंगातून मांडलेले 'लोकब्रह्म' मला कुठे पाहायला आणि अनुभवयाला मिळाले. अरे तुझ्या शब्दांमुळे काय काय घडले?

**शेक्सपिअर म्हणे।**
**तुझ्या शब्दांमुळे ।**
**मातीत खेळले । शब्दातीत ।।**

अरे तुझ्या शब्दांमुळे शब्दातीत म्हणजे शब्दांच्या पलीकडे असणारे ते परब्रह्म मराठी मातीत मुक्तपणे वावरले, खेळले. दोघांची भेट झाली. संवाद घडला. अंतरीचे गुज एकमेकांठायी व्यक्त झाले. पुढे विंदा म्हणतात, अलौकिक भेटीनंतर दोघेही दोन दिशांना गेले पण

**'कवतिक आकाशा । आवरेना ।'**

या दोघांच्या शब्दसंवादातून आकाशाला कौतुक आवरेना. शब्दांच्या आकाशाला घेऊनच तुकोबारायांचे अभंग प्रकटले तर जनविश्वाचे आकाश घेऊनच विल्यम शेक्सपिअरची रंगभूमी सजली. प्रज्ञावंतांची भेट किती अलौकिक आणि भेट रंगविणारे कवीही किती अलौकिक.

**– किशोर गांधी**

# आचार्यश्रींच्या मानवसेवेच्या शिकवणुकीचे 'जय आनंद महावीर' मंडळाकडून पालन

### मोहनलाल मानधना यांचे प्रतिपादन; आचार्यश्रींच्या पुण्यस्मृतीनिमित्त नवीपेठ येथे महाप्रसाद भोजन


राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यस्मृतीनिमित्त नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाच्यावतीने महाप्रसाद भोजनाचे आयोजन करण्यात आले.

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज हे मानवतेची शिकवण देणारे महान संत होते. देशभरातील जैन समाजाचे ते श्रद्धास्थान आहेत. नगरची भूमी त्यांच्या वास्तव्याने, पदस्पर्शाने पावन झालेली आहे. आचार्यश्रींचे संस्कार व शिकवण याचे तंतोतंत पालन जय आनंद महावीर युवक मंडळ करताना दिसून येते. दरवर्षी होणारा अन्नदानाचा उपक्रम अतिशय कौतुकास्पद आहे. दरवर्षी मंडळाचे सदस्य आचार्यश्रींच्या स्मृतीत उत्स्फूर्त रक्तदान करतात हे सुद्धा अनुकरणीय आहे, असे प्रतिपादन उद्योजक मोहनलाल मानधना यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीनिमित्त नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाच्यावतीने महाप्रसाद भोजनाचे आयोजन करण्यात आले. या महाप्रसाद वाटपाच्या शुभारंभ प्रसंगी मोहनलाल मानधना बोलत होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, ग्राहक भांडारचे चेअरमन विक्रम फिरोदिया, मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, नगरसेवक गणेश भोसले, अविनाश घुले, प्रकाश भागानगरे आशाताई डागवाले, माजी महापौर भगवान फुलसोंदर, मनोज लोंढे, सेक्रेटरी आनंद मुथा, उपाध्यक्ष कुंतीलाल राका, कार्याध्यक्ष सत्येन मुथा, अजित गांधी, चेतन गुगळे आदींसह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

उद्योजक नरेंद्र फिरोदिया की, अन्नदान आतून मिळणारे पुण्य सर्वात मोठे पुण्य असते. जय आनंद महावीर युवक मंडळाच्या सर्व सदस्यांनी राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यस्मृतीदिनी दरवर्षी अन्नदान करण्याचा उपक्रम राबवित आहेत. आचार्यश्रींची मानवतेची, सेवेची शिकवण मंडळ अतिशय चांगल्या पध्दतीने अंमलात आणत आहे.

यावर्षीही सर्वांना बुंदी, पुरी भाजी, मसालेभात असा रूचकर मेन्यू देण्यात आला. याशिवाय शहरातील वंचित, अनाथ, अपंग मुलांच्या विविध संस्थांनाही भोजन पोहोच करण्यात आले. भोजनावेळी सर्वांसाठी टेबल खुर्च्यांची तसेच थंडगार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली तसेच उन्हाळा लक्षात घेवून कुलरचीही व्यवस्था केली. आचार्यश्रींच्या स्मृतीदिनी मंडळाकडून दरवर्षी अन्नदान केले जाते, यातून प्रत्येकाला आनंदाची अनुभूती येते. जय आनंदचा जयघोष, डाळरोटी खाओ, प्रभू के गुण गाओ अशी प्रार्थना करीत मंडळाच्या महाप्रसाद भोजनाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. मनोज गुंदेचा यांनी आभार मानले.


आनंदऋषीजी महाराज स्मृतीदिनी गांधी कन्स्ट्रक्शन व दाळमंडई फौंडेशनच्या वतीने थंडाई प्रसादचे वाटप करण्यात आले.

## आचार्यश्रीजींमुळे नगरचा भारतभर नावलौकिक : आ.संग्राम जगताप

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे पावन वास्तव्य व शिकवणुकीने अहिल्यानगरचे नाव भारतभर श्रध्दा भावनेने घेतले जाते, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले. २८ मार्च या गुरूदेवांच्या स्मृतीदिनी गांधी कन्स्ट्रक्शन व दाळमंडई फौंडेशनच्या वतीने भाविकांना थंडाई प्रसादचे वाटप करण्यात आले.

जैन धर्मियांनी शहराच्या धार्मिक, आर्थिक, आरोग्य विषयक वातावरणात मोलाची भूमिका पार पाडली असून दाळमंडई फौंडेशनच्या तरुणांनी दरवर्षीप्रमाणे भाविकांना थंड रसपान देण्याचे चांगले कार्य सुरू ठेवले आहे. याला शिरूरचे सुभाष गांधी यांचे सहकार्य लाभले. गांधी कन्स्ट्रक्शनने शिरूर, पुण्याबरोबरच नगरला अतिथी भवन, नियोजित महानगरपालिका हॉस्पिटलच्या बांधकामाचे उत्कृष्ट काम केले आहे, असे गौरवोद्गारही आ.जगताप यांनी काढले.

सुभाष गांधी यांनी आनंदधाम परिसरात कार्य करीत असल्याने सुदैवी व भाग्यवान असल्याच्या भावना व्यक्त केल्या. प्रारंभी गांधी कन्स्ट्रक्शनच्यावतीने पंडितलाल गांधी यांनी स्वागत केले. यावेळी दाळमंडई फौंडेशनचे अध्यक्ष संजय ताथेड, उपाध्यक्ष सुधीर मुनोत, राजू शेटिया, पप्पू मुंदडा, नितीन चंगेडिया, अमित मुथा, किरण राका, बजरंग दरक, विजय, दिलीप, पवन, परेश, शुभम, अक्षय गांधी तथा गांधी परिवारातील सदस्य उपस्थित होते. संतोष पिपाडा यांनी आभार मानले.

# संत राजिंदर सिंह महाराज यांच्या दर्शन, प्रवचन आणि दिक्षा सोहळ्याच्या पर्वणीचा ९ वर्षांनंतर नगरकरांना लाभ

### अहिल्यानगर येथे ३१ मार्च व १ एप्रिल रोजी मिस्कीन मळा, गंगा उद्यानशेजारी होणार कार्यक्रम : कृपाल आश्रमचे महेश अंबवाणी


अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या संत राजिंदर सिंह महाराजांच्या दर्शन, प्रवचन व दिक्षा सोहळ्याची माहिती देताना सावन कृपाल आश्रमचे महाराष्ट्र विभाग प्रमुख महेश अंबवाणी. समवेत अहिल्यानगरच्या कृपाल आश्रमचे अध्यक्ष शामलाल छाबरिया, सचिव सुशील बजाज, मीडिया प्रमुख जितेंद्र भाटीया, विभागीय समन्वयक देवी लाखमीयानी आदी.

नगर – नगर शहरात २ दिवस होणाऱ्या विश्वविख्यात अध्यात्मिक संतसद्गुरु आणि सावन कृपाल रूहानी मिशनचे प्रमुख संत राजिंदर सिंह महाराज ९ वर्षांनंतर अहिल्यानगर शहरात दाखल होत आहेत. त्यामुळे त्यांच्या दर्शन, प्रवचन व दिक्षा सोहळा अशा आध्यात्मिक पर्वणीचा जिल्ह्यातील सर्व भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सावन कृपाल आश्रमचे महाराष्ट्र विभाग प्रमुख महेश अंबवाणी यांनी केले आहे.

संत राजिंदर सिंह महाराज ३१ मार्च व १ एप्रिल हे दोन दिवस अहिल्यानगरमध्ये येत आहेत. यानिमित्ताने होणाऱ्या दर्शन, प्रवचन व दिक्षा सोहळ्याची माहिती सावन कृपाल आश्रमचे महाराष्ट्र विभाग प्रमुख महेश अंबवाणी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अहिल्यानगरच्या कृपाल आश्रमचे अध्यक्ष शामलाल छाबरिया, सचिव सुशील बजाज, मिडिया प्रमुख जितेंद्र भाटीया, विभागीय समन्वयक देवी लाखमीयानी, सेवेकरी राम भावनानी व देवेंद्र शेलार आदी उपस्थित होते.

महेश अंबवाणी म्हणाले, अहिल्यानगरमध्ये ९ वर्षांनी संत राजिंदर सिंह महाराज येत आहेत. त्यांच्या स्वागताची व कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरु आहे. दोन दिवस चालणारा हा सोहळा सर्व जातीधर्मांच्या नागरिकांसाठी खुला आहे. ३१ मार्चला महाराजांच्या दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. १ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता राजिंदरसिंह महाराज प्रवचनाद्वारे प्रेम, आनंद व मनाची शांती कशी प्राप्त करावी याबाबत भाविकांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच भाविकांना दिक्षा विधी अनुग्रह प्रदान सोहळा होणार आहे. या सोहळ्यासाठी तारकपूरच्या मिस्कीन मळा येथील मैदानात सुमारे १ लाख स्क्वेअर फुटाचा भव्य मंडप उभारण्यात आला असून त्यामध्ये हजारो नागरिकांची आसान व्यवस्था करण्यात आली आहे. देश विदेशातून हजारो भाविक या सोहळ्यासाठी नगरमध्ये येत आहेत. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ५०० हून अधिक स्वयंसेवक व पोलीस प्रशासन सहकार्य करत आहेत. या सोहळ्यास जिल्ह्यातील सर्व भाविकांनी उपस्थित राहवे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविकात राम भावनानी यांनी सावन कृपाल रूहानी मिशन कृपाल आश्रमाच्या माध्यमातून सुरु असलेल्या विविध धार्मिक, समाजिक, वैद्यकीय, शैक्षणिक व आपत्ती काळातील मदत कार्याची माहिती दिली. अनिल बजाज यांनी आभार मानले.

# प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव उत्साहात; शोभायात्रेने दुमदुमली भिंगार नगरी


प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जन्मोत्सवानिमित्त भिंगार शहरात भक्तिमय वातावरणात मिरवणूक काढण्यात आली.

नगर – प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जन्मोत्सवानिमित्त भिंगार शहरात उत्साही आणि भक्तिमय वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. या सोहळ्याचे आयोजन 'प्रभू श्रीराम जन्मोत्सव समिती, भिंगार' आणि 'सकल हिंदू समाज' यांच्या वतीने करण्यात आले होते. 'जय श्रीराम'च्या जयघोषाने आणि ढोल–ताशांच्या गजराने संपूर्ण परिसर राममय झाला होता. दक्षिणमुखी हनुमान मंदिरापासून सुरू झालेली ही मिरवणूक भिंगार वेस येथील मारुती मंदिरापर्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.

मिरवणुकीचा मार्ग आणि उत्साह विजयनगर चौकातील दक्षिणमुखी हनुमान मंदिरापासून शोभायात्रेला प्रारंभ झाला. तेथून ही मिरवणूक पंचशील वेस, खळेवाडी, नेहरू चौक, ब्राह्मण गल्ली मार्गे भिंगार वेस येथील मारुती मंदिरात पोहचली. मिरवणुकीच्या मार्गावर ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि भगवे ध्वज लावून स्वागत करण्यात आले. सकल हिंदू समाजाच्या वतीने ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले.

आकर्षक देखावे आणि वेशभूषा या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रभू श्रीरामांची मूर्ती आणि बाहुबली हनुमानाचे दोन जिवंत देखावे होते, ज्यांनी भाविकांचे लक्ष वेधून घेतले. चि. स्वराज सतीश मोरे याने प्रभू श्रीराम, कु. संस्कृती सतीश मोरे आणि कु. रोशनी लाहुंडे यांनी सीतामाता आणि चि. शौर्य अंकुश तरवडे याने छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा साकारली होती. या चिमुकल्यांच्या वेशभूषेचे सर्वांनी कौतुक केले.

सांस्कृतिक आणि साहसी प्रात्यक्षिके मिरवणुकीत ढोल–ताशा पथकाच्या तालावर तरुणाई थिरकली, तर दुसरीकडे लाठी–काठी आणि तलवारबाजीची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून हिंदुत्ववादी शौर्याचे दर्शन घडवण्यात आले. हरिओम माऊली भजनी मंडळाच्या भजनांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. भक्तांचा प्रतिसाद यावर्षी लक्षणीय होता.

प्रबोधनात्मक उपक्रम केवळ उत्सवच नव्हे तर सामाजिक भान जपण्यासाठी या मिरवणुकीत 'लव जिहाद' या विषयावर प्रबोधन करण्यात आले. समाजातील ज्वलंत विषयावर जनजागृती करण्याचा हा प्रयत्न उपस्थितांनी वाखाणला. या सोहळ्यासाठी श्रीराम नवमी उत्सव समितीचे अध्यक्ष सतीश (नाना) मोरे, उद्योजक महेश झोडगे, रोहित भुजबळ, सचिन जाधव, अमित खामकर, सुरज रवे, सचिन सुसे, सचिन पेंडूरकर, अंकुश तरवडे, सुरज रवे, अशोक चेमटे, अभिषेक भगवाने, अजय गायकवाड, सुमित नकवाल, तुषार लोंढे, शुभम जगताप, राहुल लिपारे, जितेन नायर, आदी ससाने, उद्धव शिंदे, जगताप सर, ओंकार फिरोदे, शिवम भंडारी, दिनेश हिरगुडे, राहुल गुलदगड यांसह अनेक आणि रामभक्त उपस्थित होते.

प्रभू श्रीराम जन्मोत्सव समिती, भिंगार आणि सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी या मिरवणुकीच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## ३१ मार्च रोजी अहिंसा बाइक रॅलीचे आयोजन

नगर – भगवान महावीर स्वामी यांच्या जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त सकल राजस्थानी युवा मंच (ट्रस्ट) व महिला मंच यांच्या वतीने अहिंसा बाइक रॅली चे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली ३१ मार्च रोजी सकाळी १०:२० वाजता आयोजित करण्यात आली असून रॅलीची सुरुवात आनंद धाम येथून होणार आहे. या रॅलीत EV तसेच पेट्रोल बाइक सहभागी होऊ शकतात. रॅलीत सकल जैन व राजस्थानी समाजातील युवक–युवती, महिला व समाजबंधू सहभागी होणार आहेत.

रॅलीचा मार्ग पुढीलप्रमाणे राहणार आहे – आनंदधाम – मार्केट यार्ड चौक – इम्पिरियल चौक – माळीवाडा वेस – बंगाल चौकी – धरती चौक – करसट जी रोड – रामचंद्र खुंट – डाळमंडई – चितळे रोड – दिल्ली गेट – नेप्ती चौक – आयुर्वेद कॉलेज – टिळक रोड – स्वस्तिक चौक – आनंद धाम

रॅलीसाठी ड्रेस कोड निश्चित करण्यात आला असून पुरुषांसाठी पांढरा व महिलांसाठी लाल रंग ठरविण्यात आला आहे. आयोजकांनी समाजातील सदस्यांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन अध्यक्ष संदेश मुनोत यांनी केले आहे.

## भगवान महावीर जयंती निमित्त ३१ मार्च रोजी आनंदधाम येथे भक्तीसंध्या कार्यक्रमाचे आयोजन


अंकिता ब्रम्हे


सुनील झुंजे

नगर – भगवान महावीर स्वामी यांची जयंती (जन्म कल्याणक) ३१ मार्च रोजी साजरी होत आहे. यानिमित्ताने नगर शहरात शोभायात्रा, चौक सजावट, रांगोळी स्पर्धा होणार आहे. याच दिवशी संध्याकाळी ७ वाजता जैन सोशल फेडरेशनच्या वतीने आनंदधाम येथे एक सूरमई शाम, प्रभूभक्ती के नाम या 'भक्तीसंध्या' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात स्वर तारिका अंकिता ब्रम्हे व स्वर सरताज सुनील झुंजे हे आपल्या समधूर आवाजात भक्ती गीते सादर करून भाविकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न स्थानकवासी जैन धार्मिक परीक्षा अहिल्यानगरतर्फे करण्यात आले आहे.



नगर–मनमाड रोडवरील प्रेमदान चौक येथे 'युनिक कार सजावट' या अत्याधुनिक दालनाचे उद्घाटन श्रीमती हलीमा अनिस शेख यांच्या हस्ते फित कापून झाले.

## 'युनिक कार सजावट' या अत्याधुनिक दालनाचे उद्घाटन

नगर – नगर–मनमाड रोडवरील प्रेमदान चौक येथे 'युनिक कार सजावट' या अत्याधुनिक दालनाचे उद्घाटन श्रीमती हलीमा अनिस शेख यांच्या हस्ते फित कापून झाले. तद्नंतर शोरूमचे अधिकृत दालन ग्राहकांसाठी खुले करण्यात आले.

यावेळी संचालक अकबर शेख यांनी दालनाबद्दल सविस्तर माहिती देताना सांगितले की, ग्राहकांना त्यांच्या पसंतीनुसार आणि बजेटमध्ये आपल्या कारचे इंटेरियर व एक्स्टेरियर सजवता यावे, यासाठी आम्ही एकाच छताखाली सर्वोत्कृष्ट आणि जागतिक दर्जाच्या ॲक्सेसरीज उपलब्ध करून दिल्या आहेत. उत्कृष्ट दर्जा, वाजवी दर आणि अनुभवी कारागीर ही आमची मुख्य वैशिष्ट्ये असतील.

या सोहळ्याला नगरसेवक हाजी शहबाज शेख, साहेबान जहागीरदार, सलीम शेख, असिफ अनिस, राम हिरण, गौरव बुरांडे, मोनिश इनामदार, अभिषेक हरबा यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होता.

युनिक कार सजावटमध्ये ग्राहकांना हाय–क्वालिटी सीट कव्हर्स, डोअर पॅडस्, अद्ययावत अँड्रॉइड म्युझिक सिस्टम, प्रगत एलईडी लाईटस्, सेंट्रेल लॉकिंग, कार लॅमिनेशन आणि ग्राफिक डिझाइनिंग यांसारख्या अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळणार आहेत. उद्घाटनानिमित्त पहिल्या काही ग्राहकांसाठी विशेष सवलतही जाहीर करण्यात आली आहे. युनिक कार सजावट प्रेमदान चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर. मोबाईल: ९०२८१३४०६०. आपल्या कारला प्रीमियम आणि युनिक लूक देण्यासाठी आजच भेट देण्याचे आवाहन संचालक अकबर शेख यांनी केले.

# अंधारलेल्या आयुष्यांच्या जीवनात आनंदऋषी नेत्रालयामुळे 'प्रकाश'

### सुरेंद्र लोढा यांचे प्रतिपादन



आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने आयोजित मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी सुरेंद्र लोढा आदी.

### तपासणी शिबिरात ४४५ रुग्णांची मोफत तपासणी, आय बँक सुरू करण्याचा पुढाकार; ५ जिल्ह्यात २२ व्हिजन सेंटर कार्यरत

नगर – व्याधीने ग्रासलेल्या दीन–दुबळ्या रुग्णांना नवजीवन देण्याचे आणि नेत्र विभागाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचे कार्य आनंदऋषीजी हॉस्पिटल करत आहे. अंधारलेल्या आयुष्यांना, जीवनात प्रकाश निर्माण होत असून, या हॉस्पिटलची आरोग्यसेवा रुग्णांसाठी खऱ्या अर्थाने संजीवनी ठरत असून, ग्रामीण भागातील रुग्णांसाठी हे आरोग्यसेवेचे मंदिरच आधार ठरले आहे, असे प्रतिपादन सुरेंद्र लोढा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सविता लोढा, सुजाता लोढा, हेमा लोढा, मनिषा लोढा, देव लोढा, शोभा लोढा, अनिता लोढा, संजना लोढा, स्मिता लोढा, संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, डॉ. आशिष भंडारी, नेत्रालय विभागाचे प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड, प्रकाश छल्लाणी, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, नेत्र तज्ञ डॉ. अशोक महाडिक, डॉ. संदिप राणे, डॉ. प्रतिक कटारिया, डॉ. किरण शिंदे, डॉ. ऋषीकेश ठेरले आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. प्रकाश कांकरिया यांनी केले.

डॉ. वसंत कटारिया यांनी लोढा परिवाराची माहिती देताना सांगितले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात हा परिवार सक्रियपणे सहभागी झाला आहे. निखील लोढा जबाबदारीने व मनापासून काम करत असून, हा परिवार सेवाभावी व धार्मिक वृत्तीचा आहे. त्यांच्या योगदानामुळे नेत्र विभागाला अल्पावधीत मोठे यश मिळाले आहे.

संतोष बोथरा म्हणाले की, ग्रामीण भागातील दृष्टीदोष असलेल्या रुग्णांच्या वाडी–वस्तीवर जाऊन त्यांना हॉस्पिटलमध्ये आणणे, शस्त्रक्रिया करून पुन्हा घरी सोडणे, असे कार्य सातत्याने केले जात आहे. हे कार्य एका मिशनप्रमाणे राबविले जात असून, राज्यात अग्रेसर असलेल्या संस्थांमध्ये आनंदऋषीजी हॉस्पिटलचा समावेश होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. प्रतिक कटारिया यांनी सांगितले, तारकपूर येथे सुसज्ज नेत्र विभाग सुरू करण्यात आला असून, उपनगरातील नागरिक तसेच बाहेरून येणाऱ्या रुग्णांची सोय करण्यात आली आहे. या विभागात अवघ्या पाच महिन्यांत ५ हजारांहून अधिक रुग्णांनी उपचार घेतले असल्याची माहिती त्यांनी दिली. संजना लोढा यांनी डॉक्टर, कर्मचारी व विश्वस्तांच्या सेवाभावी कार्यामुळे हे आरोग्य मंदिर उभे राहिले असल्याचे सांगत आभार मानले.

शिबिरात ४४५ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. यामधील गरजू रुग्णांवर अल्पदरात मोतीबिंदू, काचबिंदू आदी नेत्रदोषांवरील शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# 'योगीत ब्राइट ॲण्ड व्हाईट डेंटल क्लिनिक'चा राष्ट्रीय फॅमडेंट अवॉर्डस्‌मध्ये ऐतिहासिक विजय

### 'डेंटल ऑस्कर'ने सन्मानित



'योगीत ब्राइट ॲण्ड व्हाईट डेंटल क्लिनिक'चा राष्ट्रीय फॅमडेंट अवॉर्डस्‌मध्ये ऐतिहासिक विजयाबद्दल डॉ. गीतांजली सोनावणे आणि डॉ. प्राजक्ता सावेडकर यांच्या दूरदृष्टीने आणि नेतृत्वाखाली चालणाऱ्या या क्लिनिकला 'विजेते' म्हणून गौरविताना मान्यवर.

नगर – भारतीय दंतचिकित्सा क्षेत्रातील 'ऑस्कर' मानला जाणारा 'फॅमडेंट डेंटल एक्सलन्स अवॉर्डस् २०२६' सोहळा २१ मार्च रोजी नेस्को एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव, मुंबई येथे पार पडला. या सोहळ्यात देशभरातील दिग्गज दंतवैद्यक आणि संशोधक उपस्थित होते. महाराष्ट्राच्या दंतचिकित्सा क्षेत्रासाठी ही रात्र ऐतिहासिक ठरली, कारण अहिल्यानगरमधील 'योगीत ब्राइट ॲण्ड व्हाईट डेंटल क्लिनिक' ने राष्ट्रीय स्तरावर पदार्पण करत नेत्रदीपक यश संपादन केले. भारतीय दंत उद्योगातील सर्वोच्च मानाचा मानल्या जाणाऱ्या या सोहळ्यात, देशातील सर्वोत्तम क्लिनिक्सच्या स्पर्धेत या क्लिनिकने अव्वल विजेते म्हणून नाव कोरले.

डॉ. गीतांजली सोनावणे आणि डॉ. प्राजक्ता सावेडकर यांच्या दूरदृष्टीने आणि नेतृत्वाखाली चालणाऱ्या या क्लिनिकला खालील श्रेणीमध्ये 'विजेते' म्हणून घोषित करण्यात आले

हा विजय अत्यंत महत्त्वाचा आहे कारण या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार सोहळ्यात 'विजेत्यांच्या पॅनेल'मध्ये स्थान मिळवणारे 'योगीत ब्राइट ॲण्ड व्हाईट डेंटल क्लिनिक' हे अहिल्यानगरमधील पहिलेच क्लिनिक ठरले आहे. या यशामुळे भारताच्या उच्च दर्जाच्या आणि एलिट दंत आरोग्य सेवांच्या नकाशावर अहिल्यानगरचे नाव अभिमानाने कोरले गेले आहे. क्लिनिकचे यश केवळ उपचारांपुरते मर्यादित नव्हते, तर त्यांच्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचेही कौतुक करण्यात आले. 'बेस्ट डेंटल क्लिनिक इंटिरियर (नॉन–मेट्रोपॉलिटन)' या श्रेणीसाठी देखील क्लिनिकला नामांकन मिळाले होते. दिग्गज दंत तज्ज्ञांच्या ज्युरींनी भारतभरातील शेकडो अर्जांचे मूल्यमापन केले. यामध्ये प्रगत क्लिनिकल प्रोटोकॉल, निर्जंतुकीकरण, रुग्णांची सोय, सौंदर्यात्मक उत्कृष्टता आणि मेट्रो शहराबाहेर उपलब्ध करून दिलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान या निकषांवर क्लिनिकची निवड करण्यात आली.

अहिल्यानगरसाठी मार्गदर्शक ठरलेल्या डॉ. गीतांजली यांनी सोहळ्यानंतर सांगितले की, आमचे उद्दिष्ट नेहमीच अहिल्यानगरमध्ये दंतचिकित्सेचे जागतिक मानक आणण्याचे राहिले आहे, जेणेकरून आमच्या रुग्णांना प्रगत उपचारांसाठी मोठ्या शहरांमध्ये जावे लागणार नाही. फॅमडेंटमध्ये आमच्या शहरातून पहिले विजेते ठरणे हा आमचा सन्मान असून हा अभिमान आम्ही आमचे सर्व दंत सहकारी आणि रुग्ण समुदायासोबत साजरा करत आहोत.

फॅमडेंट एक्सलन्स अवॉर्ड्स हे गुणवत्तेचा मानदंड मानले जातात आणि या विजयामुळे 'योगीत ब्राइट ॲण्ड व्हाईट डेंटल क्लिनिक' आता देशातील अग्रगण्य दंत उपचार केंद्रांपैकी एक म्हणून ओळखले जाणार आहे.

## 'फॉर्च्यून फूडस्' दालना चे उद्घाटन



निसर्गाचा अनमोल खजाना आणि शुद्धतेची खात्री देणारे दालन फॉर्च्यून फूडस् चे आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

नगर – निसर्गाचा अनमोल खजाना आणि शुद्धतेची खात्री देणारे दालन फॉर्च्यून फूडस् चे २९ मार्च रोजी आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उद्घाटन झाले. जुनी वसंत टॉकीज रोडवरील कावरे हाईटस् येथे हे दालन ग्राहकांच्या सेवेत दाखल झाले आहे. या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी नगरसेवक संपत बारस्कर, अविनाश घुले, बाळासाहेब बोराटे, संभाजी कदम, तसेच जाखोटिया परिवारातील भरत जाखोटिया, अनिरुद्ध जाखोटिया, पराग जाखोटिया यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होते.

यावेळी माहिती देताना संचालक अनिरुद्ध जाखोटिया म्हणाले की, अहिल्यानगरवासीयांना एकाच छताखाली जागतिक दर्जाचे ड्रायफ्रूटस् (सुकामेवा), ड्राइड फ्रूटस्, फ्रेश फ्रूटस्, सुगंधी मसाले, चॉकलेट्स आणि विविध प्रकारचे सीड्स उपलब्ध करून देणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. 'फॉर्च्यून फूडस्'च्या माध्यमातून आम्ही शुद्धतेचा शब्द (Promise of Purity) देत आहोत. खास करून सण–समारंभांसाठी येथे आकर्षक 'गिफ्ट हॅम्पर्स' देखील उपलब्ध आहेत.

उद्घाटनानंतर बोलताना आ. संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगरच्या व्यापार क्षेत्रात जाखोटिया परिवाराने नेहमीच विश्वासार्हता जपली आहे. 'फॉर्च्यून फूडस्'च्या माध्यमातून त्यांनी शहरात एक दर्जेदार दालन सुरू केले असून, यामुळे नागरिकांना आता उत्तम दर्जाच्या वस्तू आपल्याच शहरात मिळतील. शुद्धता आणि गुणवत्ता यांचा मेळ असलेल्या या उपक्रमाला माझ्या मनापासून शुभेच्छा.

फॉर्च्यून फूडस्, शॉप नं. ३, कावरे हाईटस्, जुनी वसंत टॉकीज रोड, अहिल्यानगर. हे दालन दररोज सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत खुले राहणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क ८२६१०४६८७३

# 'ब्राह्मण संघा'तर्फे ३ मे रोजी 'सामुदायिक व्रतबंध सोहळा'

नगर – ब्राह्मण सेवा संघ, केडगाव यांच्या वतीने ३ मे रोजी सामुदायिक व्रतबंध (मुंज) सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा पवित्र सोहळा श्री छत्रपती शिवाजी मंगल कार्यालय, अंबिकानगर, केडगाव येथे होणार आहे.

या सोहळ्याचे पौरहित्य वेदमूर्ती पंढरपूरकर गुरुजी करणार असून, विशेष बाब म्हणजे गुरुजी आजवर या सोहळ्यासाठी कधीही दक्षिणा स्वीकारत नाहीत. ते स्वतःसोबत पाच ते सहा गुरुजींना घेऊन येतात. भिक्षावळीच्या माध्यमातून जमा होणाऱ्या रकमेची संपूर्ण पावती संघाच्या नावाने केली जाते, ही या उपक्रमाची पारदर्शकता दर्शविणारी बाब आहे.

ब्राह्मण सेवा संघ, केडगाव गेल्या २७ वर्षांपासून सातत्याने हा सामुदायिक व्रतबंध सोहळा आयोजित करत असून, आजवर महाराष्ट्रातील विविध भागांतून अनेक बटूंनी या सोहळ्यात सहभाग नोंदविला आहे. त्यामुळेच केडगावच्या मुंजीचा नावलौकिक संपूर्ण महाराष्ट्रात पसरला आहे.

हा संपूर्ण धार्मिक व सामाजिक उपक्रम अहिल्यानगर जिल्ह्यातील समाजबांधवांच्या देणगी स्वरूपातील सहकार्यामुळे शक्य होत आहे. अत्यंत अल्प वर्गणीत बटूंना अल्पोपहार, भोजन तसेच संस्कार विधीस लागणारा सर्व खर्च संघातर्फे केला जातो. विशेष म्हणजे, ज्या बटूंच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट आहे, अशा कुटुंबातील बटूंची मुंज मोफत अथवा सवलतीच्या शुल्कात करण्यात येते.

ज्या समाजामध्ये व्रतबंध संस्कार केला जातो, त्या सर्व समाजबांधवांना या सामुदायिक सोहळ्यात सहभागी होता येते. समाजातील अधिकाधिक कुटुंबांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष नंदकुमार पोळ यांनी केले आहे.

नोंदणी व माहितीसाठी संपर्क : नंदकुमार पोळ ७८७५५०००५६, नंदकुमार कुलकर्णी ८७८८७३९९३, ज्ञानेश देशपांडे ९२२६३६१३५७, पंकज जहागीरदार ९०२८८७५५५९, नितीन क्षीरसागर ९४२३३८९५९३, आनंद ठीपसे ९६०४७७४४२३

## अत्याधुनिक सुपरस्पेशालिटी बाल न्यूरोलॉजी क्लिनिक नगरमध्ये सुरू

### लहान मुलांच्या मेंदूविकारांवर आता स्थानिक पातळीवरच अचूक निदान व उपचार शक्य



महापौर ज्योतिताई गाडे यांनी अत्याधुनिक सुपरस्पेशालिटी बाल न्यूरोलॉजी क्लिनिकला भेट दिली.

नगर – नगर जिल्ह्यात आरोग्य सेवांच्या क्षेत्रात एक महत्त्वाची भर पडत अत्याधुनिक सुपरस्पेशालिटी बाल न्यूरोलॉजी क्लिनिक सुरू झाले असून, यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महापौर ज्योतिताई गाडे यांनी या क्लिनिकला भेट देत प्रगत आरोग्य सुविधांचे कौतुक केले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, नगर जिल्ह्यात अशा प्रकारचे सुपरस्पेशालिटी क्लिनिक उपलब्ध होणे ही अभिमानाची बाब आहे. यामुळे रुग्णांना आता पुणे–मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज उरलेली नाही. स्थानिक पातळीवरच अत्याधुनिक उपचार मिळणे ही नागरिकांसाठी मोठी सोय ठरणार आहे.

या क्लिनिकमुळे विशेषतः लहान मुलांमध्ये आढळणाऱ्या मेंदूविकारांचे अचूक व वेळेत निदान करणे शक्य होत असून, नवजात बाळांपासून ते १८ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी येथे सर्वसमावेशक उपचार सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. एकाच छताखाली सर्व तपासण्या व उपचार उपलब्ध असल्याने पालकांचा वेळ, पैसा आणि त्रास मोठ्या प्रमाणात वाचणार आहे.

क्लिनिकमध्ये EEG, NCV, EMG, VEP, BERA यांसारख्या अत्याधुनिक तपासण्या प्रगत यंत्रसामग्रीच्या सहाय्याने केल्या जात असून, या सर्व तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली पार पडतात. त्यामुळे रुग्णांना अचूक निदानासोबतच योग्य उपचार योजना निश्चित करण्यात मोठी मदत होते.

या क्लिनिकचे मार्गदर्शन पेडियाट्रिक न्यूरोलॉजिस्ट डॉ. स्नेहा शिरसाठ पाटील आणि डॉ. सागर शिरसाठ पाटील करत असून, त्यांच्या तज्ज्ञ अनुभवाच्या आधारे रुग्णांना सातत्यपूर्ण फॉलो–अपसह दर्जेदार सेवा दिली जात आहे. रुग्णांच्या आरोग्य सुधारण्यावर विशेष भर देत वैयक्तिक लक्ष देण्याची पद्धत येथे अवलंबली जात आहे.

दरम्यान, 'पर्पल डे' (Epilepsy Awareness Day) निमित्त क्लिनिकच्या वतीने जनजागृती उपक्रम व मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून एपिलेप्सी (अपस्मार) या आजाराबाबत समाजात जागरूकता निर्माण करण्यात आली. योग्य वेळी निदान आणि उपचार केल्यास हा आजार नियंत्रणात ठेवता येतो, हा महत्त्वाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आला.

महापौर ज्योतिताई गाडे यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करताना सांगितले की, अशा प्रकारचे आरोग्यविषयक उपक्रम समाजासाठी अत्यंत आवश्यक असून, भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमास डॉ. सागर शिरसाठ पाटील, रावसाहेब म्हस्के, सोमनाथ खांदवे, संकेत म्हस्के, जयश्री म्हस्के, प्रियंका म्हस्के, डॉ. चारुशीला म्हस्के उपस्थित होते.



सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक स्व.डॉ.नाथ पाऊलबुधे यांच्या २२ व्या स्मृतिदिनानिमित्त सर्व शैक्षणिक युनिट च्या वतीने आदरांजली अर्पण करण्यात आली. (छाया – विजय मते)

# सत्ता ही सेवेसाठी असते, हे डॉ. नाथ पाऊलबुधे यांनी कार्यातून दाखविले

### डॉ.मंदार कुलकर्णी यांचे प्रतिपादन, शैक्षणिक संकुलातर्फे २२ व्या स्मृतिदिनी आदरांजली अर्पण

नगर – कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा नसताना सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक जीवनामध्ये नगर शहरासह जिल्ह्यात समाजपयोगी कार्य करून सत्ता ही सेवेसाठी असते हे मूल्य जोपासत सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याबरोबरच विडी कामगारांच्या वसाहतीचा प्रश्न, गोरगरीब मुला–मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवून आपल्या कार्यातून त्यांनी दाखविले, असे प्रतिपादन डॉ. मंदार कुलकर्णी यांनी केले.

वसंत टेकडी येथे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक स्व.माजी आमदार डॉ.नाथ पाऊलबुधे यांचा २२ वा स्मृतिदिन निमित्त सर्व शैक्षणिक युनिटच्यावतीने आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ.मंदार कुलकर्णी, संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे सर्व युनिटचे प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक वृंद आदी उपस्थित होते.

डॉ.कुलकर्णी म्हणाले, नाथ पाऊलबुधे व्यवसायाने डॉक्टर होते. पण एक माणुसकी धर्म म्हणून सेवा ते रुग्णांना देत असत. गोरगरिबां विषयी त्यांना खूप आस्था असायची, पैसे न घेता ते औषध उपचार करीत चरितार्थाचे साधन म्हणून डॉक्टरकीचा व्यवसाय त्यांनी केला नाही. विधान परिषदेवर एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून शरदचंद्र पवार यांनी नियुक्ती केली. ६ वर्षे आमदार असताना शहराचा विकास, विडी कामगारांचे प्रश्न, शैक्षणिक क्षेत्रातील समस्या यावर लक्ष केंद्रित करून सेवा शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून प्राथमिक, माध्यमिक, कॉलेज उभे केले. त्यामुळे आज परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची चांगली सोय उपलब्ध झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेचे सचिव रामकिसन देशमुख म्हणाले डॉ. नाथ पाऊलबुधे यांनी शैक्षणिक संकुलात लावलेले या छोट्या रोपट्याचे मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाले. आज येथे इंजिनिअरिंग, फार्मसी, डीएड, बीएड, आयुर्वेद महाविद्यालय सुरू झाल्याने त्यांच्या कार्याची हे संकुल एक प्रकारे साक्ष देत आहेत. आपल्या कामावर निष्ठा ठेवून अजून समाजात शिक्षणाचे महत्त्व देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

# दातांची ठणक : कारणे व उपचार

बऱ्याचदा आपण दातांना ठणक लागल्याचे ऐकतो किंवा स्वत: अनुभवतो अदाजे ८–५७% लोकसंख्या या समस्येला सामोरे जाते ठणक म्हणजे बाहेरील उत्तेजनक गोष्टीला मिळालेला क्षणिक वेदनामय पतिसाद होय. उदा थंड गरम पदार्थ.

स्पर्श, अतिकोरडेपणा, दाब इ. कारणे –

१. दातांची झीज – चुकीच्या ब्रश पद्धती झोपेत दात खाणे (Bruxism), धुम्रपान इ.

२. आंबट, मसालेदार पदार्थ, पेप्सी, कोक इ. शितपेयांचे अतिसेवन, आम्लपित्त इ.

३. हिरड्यांची झीज – दातांची मुळे हिरड्या झिजल्याने उघडी पडतात

४. दातांवर साचलेले किटण – दातांमध्ये साचलेले अन्नकण व त्यावर जमलेला सुक्ष्मजीवांचा थर

**ठणक का लागते ?**

दाताचा स्वात वरचा थर एनॅमल झिजला की दुसरा थर म्हणजेच डेंटिन उघडा पडतो – डेंटिनच्या सुक्ष्म नळ्यांपयंत (dentinal tubules) कारणीभूत घटक पोहचले की ठणक सुरू होते.

**निदान** : ठणक लागण्याचे नेमके कारण समजणे आवश्यक आहे. ठणक लागणे व दात दुखणे यांची लक्षणे वेगळी असतात. जसे की दाताचा तुकडा पडणे, जुने भरलेले चॉदी, सिमेंट तुटणे, किड इ. मध्येही ठणके सारखी संवेदना जाणवते यामुळे दंतरोगतज्ञांचे मार्गदर्शन व निदान खुप आवश्यक आहे

**उपचार** : १. योग्य ब्रश पद्धती – खुप जोरात ब्रश न करता हळुवार व आतुन बोहरून दाताचा जेवणाचा भाग नीट साफ करणे, अपघर्षक (abrasive) पेस्टचा अतिवापर टाळावा

२. अतिआंबट व मसालेदार पदार्थ रात्रीच्या जेवणात किंवा झोपण्याआधी टाळा आम्लयुक्त द्रव्य पेय. शक्यतो स्टॉने प्या जेवण व झोपेच्या वेळा पाळा.

३. संवेदना ठणक कमी करणारे टूथपेस्ट. माऊथवॉश स्वस्त व प्रभावी ठरतात.

४. मटेरियल भरणे – दातांची झिज, खाचा खोल असल्यास फक्त सेंसिटीव्हिटी पेस्टने काम होत नाही. अशावेळी डॉक्टर दातात चांदी किंवा दाताच्या रंगाचे सौंदयात्मक (esthetic) मटेरियल भरणे.

५. हिरड्यांचे उपचार–हिरड्या निरोगी असल्याने दातांची मुळे सुरक्षित राहतात.

**– डॉ. रत्ना गणेश नजन, ८७८८४५१०९५.**
साई डेंटल क्लिनिक, संकल्प बिल्डिंग,
सुबक कलेक्शनच्या वर, यशोदानगर जवळ,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर.
dr.ratna1991@gmail.com

# अर्थजगत

**घर खरेदी करणे हे सर्वसामान्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठे स्वप्न असते आणि हे स्वप्न सुरक्षित ठेवण्यासाठी गृहविमा म्हणजेच होम इन्शुरन्स अत्यंत महत्त्वाचा ठरतो. मात्र, अनेकदा विम्याच्या अटींमधील तांत्रिक शब्दांचा अर्थ न समजल्यामुळे ऐनवेळी विमा कंपन्यांकडून दावे फेटाळले जातात.**

## गृहविम्यातील टर्म समजून न घेतल्यास...

धीरज खन्ना यांच्या ताज्या प्रकरणाने विमा क्षेत्रातील 'सिपेज' आणि 'लीकेज' या दोन शब्दांमधील सूक्ष्म पण महत्त्वाचा फरक समोर आणला आहे. खन्ना यांनी २९ लाख रुपयांचे गृहकर्ज घेताना घराचा विमा उतरवला होता. काही काळानंतर त्यांच्या घरातील फरशी खचली आणि भिंतींचे रंग खराब झाले. त्यांनी दुरुस्ती करून विमा कंपनीकडे ६.१८ लाख रुपयांचा दावा केला, जो कंपनीने 'सिपेज'चे कारण देऊन नाकारला होता. मात्र, चंदीगडच्या ग्राहक आयोगाने हा निर्णय बदलून खन्ना यांच्या बाजूने निकाल दिला.



**सिपेज–लीकेजचा अर्थ**

या निकालात आयोगाने स्पष्ट केले की, खन्ना यांच्या घराचे नुकसान हे 'लीकेज'मुळे झाले होते, जे विम्याच्या कक्षेत येते. विम्याच्या परिभाषेत 'सिपेज' म्हणजे जेव्हा भिंतींमधून किंवा जमिनीतून हळूहळू ओलावा आत शिरतो आणि दीर्घकाळानंतर नुकसान होते. अशा प्रकारच्या नुकसानीला सहसा विमा संरक्षण नसते, कारण ते देखभालीचा भाग मानले जाते. याउलट 'लीकेज' म्हणजे घरातील पाईप अचानक फुटणे किंवा उपकरणांमधील बिघाडामुळे पाणी वेगाने वाहून होणारे नुकसान होय. अशा परिस्थितीत विमा कंपनीला नुकसान भरपाई द्यावीच लागते. विशेष म्हणजे, एखादे नुकसान विम्याच्या कक्षेबाहेर का आहे, हे सिद्ध करण्याची सर्व जबाबदारी केवळ विमा कंपनीची असते, असेही आयोगाने ठणकावून सांगितले.

विमा घेताना 'घरफोडी' आणि 'चोरी' यातील कायदेशीर फरक समजून घेणे तितकेच आवश्यक आहे. कोणी बळजबरीने किंवा हिंसा करून घरात शिरले आणि चोरी केली, तरच त्याला विमा संरक्षण मिळते. मात्र, जर घरातील नोकर किंवा ओळखीच्या व्यक्तीने गुपचूप चोरी केली असेल, तर विमा कंपनी त्याची भरपाई देत नाही. तसेच, कोणत्याही घटनेची माहिती मिळताच त्वरित पोलिसात प्रथम खबरीत म्हणजेच एफआयआर नोंदवणे आणि विमा कंपनीला कळवणे अनिवार्य असते. खन्ना यांच्या प्रकरणात चोरीचा दावा फेटाळला गेला, कारण त्यांनी पोलिसांकडे तक्रार करण्यास खूप उशीर केला होता. त्यामुळे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करणे हा विमा मिळवण्याचा मुख्य आधार आहे.

आगीमुळे होणाऱ्या नुकसानीबाबतही अनेक नियम आहेत. जर घराला आग लागली तर विमा मिळतो, पण जर ती आग शॉर्ट सर्किटमुळे लागली असेल आणि तुमच्याकडे त्यासाठीचे जास्तीचे संरक्षण म्हणजेच 'ॲड ऑन' नसेल, तर दावा नाकारला जाऊ शकतो. तसेच, नैसर्गिक आपत्ती जसे की भूस्खलन किंवा डोंगर खचल्यामुळे घराचे नुकसान झाले तर विमा मिळतो, पण बांधकामातील दोष, निकृष्ट साहित्य किंवा साध्या भेगांसाठी विमा कंपनी पैसे देत नाही. गंज लागणे, घराची झीज होणे किंवा जाणूनबुजून केलेले नुकसान या गोष्टी विम्याच्या कक्षेत कधीच येत नाहीत. त्यामुळे विमा घेताना आपल्याला नेमके कशाचे संरक्षण हवे आहे, हे नीट तपासायला हवे.

विमा खरेदी करताना ग्राहकांनी घराचे मूल्य ठरवताना सावधगिरी बाळगायला हवी. अनेकजण घराचा विमा त्याच्या बाजारभावानुसार काढतात. मात्र, घराचे नुकसान झाल्यावर ते पुन्हा बांधण्यासाठी येणारा खर्च म्हणजेच 'रिइन्स्टेटमेंट व्हॅल्यू' लक्षात घेऊन विमा उतरवणे अधिक फायदेशीर ठरते. बाजारभाव हा जमिनीच्या किमतीवर अवलंबून असतो, जो दरवर्षी बदलतो, पण घराच्या बांधकामाचा खर्च हा प्रत्यक्ष विम्यासाठी महत्त्वाचा असतो. जर घराचा विमा कमी किमतीचा असेल, तर प्रत्यक्ष नुकसान झाल्यावर विमा कंपनी पूर्ण पैसे न देता केवळ ठराविक हिस्साच देते, ज्याला 'प्रो राटा' पद्धत म्हणतात.

शेवटी, विमा कंपनीला घराची सर्व माहिती स्पष्टपणे देणे हा सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. घराचे बांधकाम कसे आहे, घरात काही व्यावसायिक काम चालते का, तळघर किंवा छताची स्थिती काय आहे, या सर्व गोष्टी अर्जात नमूद कराव्यात. जर तुम्ही माहिती लपवली तर दावा करण्याच्या वेळी विमा कंपनी तुमची पॉलिसी अवैध ठरवू शकते. आपल्या मौल्यवान वस्तूंची स्वतंत्र यादी बनवून ठेवल्यास भविष्यात दाव्याची प्रक्रिया सोपी होते. विम्याचे कागदपत्र हे केवळ एक कागद नसून ते संकटाच्या काळातील तुमची ढाल आहे, त्यामुळे त्यातील अटी नीट वाचूनच त्यावर स्वाक्षरी करणे हिताचे ठरते.



## बाजार कितीही कोसळू दे...!

**शेअर बाजार कितीही कोसळला तरी ज्या गुंतवणूकदारांना सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन अर्थात एसआयपीमधील युनिट्सचे गणित नीट समजले आहे ते आपला पैसा गुंतवणे कधीही थांबवणार नाहीत उलट अशा काळात त्यांची कमाई दुप्पट होण्याची शक्यता अधिक असते.**

एसआयपी ही केवळ एक गुंतवणूक नसून ती शिस्तबद्ध बचतीची पद्धत आहे. जेव्हा बाजार खाली येतो तेव्हा सामान्य गुंतवणूकदार घाबरून आपली गुंतवणूक थांबवतात परंतु नेमकी हीच वेळ सर्वात भक्कम गुंतवणूक करण्याची असते हे समजून घेणे आवश्यक आहे. एसआयपीमध्ये आपण दरमहा ५००० किंवा १०००० रुपयांसारखी एक ठराविक रक्कम गुंतवतो आणि या पैशातून थेट शेअर्स न खरेदी करता म्युच्युअल फंडाचे युनिटस् विकत घेतले जातात. या युनिटस्च्या किमतीला एनएव्ही म्हणजेच नेट ॲसेट व्हॅल्यू असे म्हटले जाते. साध्या भाषेत सांगायचे तर एनएव्ही म्हणजे एका युनिटची किंमत असते.

मिळणाऱ्या युनिटस्ची संख्या ठरवण्याचे सूत्र अत्यंत सोपे आहे. यामध्ये तुमची एकूण गुंतवणूक रक्कम आणि त्यावेळची एनएव्ही यांचा भागाकार केला जातो.

समजा १०००० रुपयांच्या गुंतवणुकीवर जर एनएव्ही १०० रुपये असेल तर तुम्हाला १०० युनिट्स मिळतात; पण जर बाजार पडला आणि एनएव्ही ८० रुपयांवर आली तर त्याच १०००० रुपयांमध्ये तुम्हाला १२५ युनिट्स मिळतात.

जर एनएव्ही अजून घसरून ७० रुपयांवर आली तर तुम्हाला १४२ युनिट्स प्राप्त होतात.

याचाच अर्थ असा की जेव्हा बाजार पडतो तेव्हा तुम्हाला जास्त युनिटस् म्हणजेच फंडातील जास्त भागीदारी मिळते. या प्रक्रियेलाच रुपी कॉस्ट एव्हरेजिंग असे म्हणतात.

आपण तीन महिन्यांच्या गुंतवणुकीचा विचार केला आणि एनएव्ही १००, ८० आणि ७० अशी राहिली तर तुमची एकूण गुंतवणूक ३०००० रुपये होते आणि तुमच्याकडे ३६७ युनिट्स जमा होतात. अशा वेळी तुमची सरासरी खरेदी किंमत केवळ ८१.७ रुपये इतकी खाली येते.

जेव्हा बाजार पुन्हा सावरतो आणि एनएव्ही पुन्हा १०० रुपयांवर पोहोचते तेव्हा तुमच्याकडे असलेल्या ३६७ युनिटस्चे मूल्य ३६७०० रुपये होते. तुमची मूळ गुंतवणूक ३०००० रुपये असताना तुम्हाला ६७०० रुपयांचा नफा मिळतो.

**'बिअर मार्केट बोनस'**

हा जास्तीचा नफा केवळ बाजार पडलेला असताना तुम्ही गुंतवणूक सुरू ठेवून जास्त युनिटस् जमा केल्यामुळेच शक्य होतो. गुंतवणूक क्षेत्राच्या भाषेत याला 'बिअर मार्केट बोनस' असेही म्हटले जाते.

पडणारा बाजार हा एसआयपी गुंतवणूकदारांसाठी एका अर्थाने डिस्काउंट सेलसारखा असतो. बहुतेक गुंतवणूकदार बाजार पडला की भीतीपोटी गुंतवणूक बंद करतात आणि बाजार वधारल्यावर पुन्हा सुरू करतात. यामुळे ते महाग दरात खरेदी करतात आणि स्वस्त दरात मिळणारी संधी गमावतात.


वास्तविक पाहता एसआयपी कधीही बाजारातील चढ–उतार पाहून बंद करू नये. जेव्हा तुमचे आर्थिक ध्येय पूर्ण होते किंवा पोर्टफोलिओमध्ये काही मोठे बदल करायचे असतात तेव्हाच असा निर्णय घेणे योग्य ठरते. दीर्घकाळ म्हणजेच १० ते १५ वर्षे गुंतवणूक सुरू ठेवल्यास चक्रवाढ व्याजाचा फायदा मिळतो आणि बाजारातील अस्थिरता आपोआप संतुलित होते. युनिट्स मिळण्याचे गणित आणि एनएव्हीची कार्यपद्धती एकदा लक्षात आली की पडत्या बाजारात गुंतवणूक सुरू ठेवणे हाच सर्वात मोठा शहाणपणा ठरतो कारण तीच भविष्यातील मोठ्या कमाईची पायाभरणी असते.

## पत्नीच्या नावे 'एसआयपी' करताय?

**भारतीय कुटुंबांमध्ये पती आपल्या कमाईचा काही हिस्सा पत्नीच्या नावाने गुंतवतो, हे चित्र सर्रास दिसते. यामागे गुंतवणूक वाढवणे आणि टॅक्स वाचवणे हा दुहेरी हेतू असतो. अनेकजण पत्नीच्या खात्यातून एसआयपी सुरू करतात, कारण त्यातून मिळणारा नफा हा पत्नीचे उत्पन्न मानले जाईल आणि त्यावर टॅक्स भरावा लागणार नाही, असा त्यांचा समज असतो. मात्र, आयकर विभागाचे नियम इतके सोपे नाहीत. 'क्लबिंग ऑफ इन्कम' नावाची एक कायदेशीर तरतूद अशा प्रकरणांमध्ये संपूर्ण चित्र बदलू शकते. गुंतवणुकीसाठी पैसा पती देत असेल, तर त्यातून होणाऱ्या कमाईवर टॅक्स भरण्याची जबाबदारी देखील पतीचीच असू शकते.**

● **काय आहे 'क्लबिंग ऑफ इन्कम'? :** समजा, तुम्ही तुमच्या पत्नीच्या बँक खात्यात दरमहा १०,००० रुपये ट्रान्सफर केले आणि त्यांनी त्या पैशातून म्युच्युअल फंड एसआयपी सुरू केली. वर्षाच्या शेवटी त्या गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळाला. जर पत्नीचे दुसरे कोणतेही उत्पन्न नसेल, तर हा परतावा टॅक्स फ्री असेल, असे तुम्हाला वाटू शकते. मात्र, आयकर अधिनियमाच्या सेक्शन ६४ नुसार येथे 'क्लबिंग'चा नियम लागू होतो. पती आपल्या पत्नीला गुंतवणुकीसाठी पैसे देतो आणि त्या बदल्यात कोणताही 'योग्य मोबदला' (ॲडेक्वेट कन्सिडरेशन) घेत नाही, तेव्हा त्या गुंतवणुकीतून होणारी सर्व कमाई पतीच्या उत्पन्नात जोडली जाते. म्हणजेच, म्युच्युअल फंडाचा डिव्हिडंड किंवा कॅपिटल गेन हा पतीच्या एकूण उत्पन्नाचा भाग मानला जाईल आणि पतीच्या टॅक्स स्लॅबनुसार (उदा. २०% किंवा ३०%) त्यावर टॅक्स आकारला जाईल.

अनेकदा लोक या नियमातून वाचण्यासाठी अशा व्यवहाराला 'गिफ्ट' (भेटवस्तू) असे नाव देतात. कायद्यानुसार, पती आपल्या पत्नीला कितीही रक्कम गिफ्ट म्हणून देऊ शकतो आणि सेक्शन ५६ अंतर्गत अशा गिफ्टवर कोणताही 'गिफ्ट टॅक्स' लागत नाही. मात्र, येथे एक सूक्ष्म कायदेशीर अडचण आहे. रक्कम ट्रान्सफर करताना टॅक्स लागत नसला तरी, जसा तो 'गिफ्टेड मनी' कुठे गुंतवला जातो, तसे क्लबिंगचे नियम पुन्हा सक्रिय होतात. पत्नीने त्या पैशातून एसआयपी केल्यास मिळणारा नफा पुन्हा पतीच्या खात्यातच टॅक्ससाठी मोजला जाईल. थोडक्यात, गिफ्ट देणे टॅक्स फ्री आहे, पण त्या गिफ्टमधून 'पैसे कमावणे' पतीसाठी टॅक्सची जबाबदारी निर्माण करते.




● **कायदेशीर मार्गाने टॅक्स वाचवण्याची 'स्मार्ट' रणनीती :** पत्नीच्या नावे गुंतवणूक करणे पूर्णपणे व्यर्थ आहे असे नाही, तर त्यासाठी काही योग्य रणनीती वापरणे गरजेचे आहे. पहिली पद्धत म्हणजे, पतीने पत्नीला पैसे गिफ्ट केल्यावर ते पीपीएफ (पब्लिक प्रॉव्हिडंट फंड) किंवा सुकन्या समृद्धी योजनेसारख्या टॅक्स–फ्री साधनांमध्ये गुंतवावेत. येथे मिळणारे व्याज आधीच टॅक्सच्या कक्षेबाहेर असल्याने क्लबिंग होऊनही पतीला अतिरिक्त टॅक्स द्यावा लागणार नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे 'रिटर्नवर रिटर्न' (सेकंड जनरेशन इन्कम). क्लबिंगचा नियम केवळ मूळ गुंतवणुकीतून होणाऱ्या पहिल्या कमाईवर लागू होतो. जर पत्नीला एसआयपी मधून मिळालेला नफा तिने पुन्हा कुठे गुंतवला, तर त्या 'नफ्यावर मिळणाऱ्या नफ्या'वर क्लबिंग लागू होत नाही. ते उत्पन्न पत्नीचे वैयक्तिक उत्पन्न मानले जाते.

● **आयटीआर फाईल करताना:** टॅक्स चोरी आणि टॅक्स प्लॅनिंग यामध्ये खूप पुसट रेषा असते. जर तुम्ही पत्नीचे एसआयपी उत्पन्न लपवले, तर ते टॅक्स चोरीच्या श्रेणीत येऊ शकते. त्यामुळे आयटीआर भरताना पतीला आपल्या रिटर्नमध्ये 'शेड्यूल एसपीआय' (स्पेसिफाईड पर्सन्स इन्कम) भरणे अनिवार्य आहे, जिथे पत्नीच्या उत्पन्नाचा खुलासा करणे आवश्यक असते. तसेच, पत्नीने आपल्या गुंतवणुकीची माहिती 'शेड्यूल एएल' (ॲसेट्स अँड लायबिलिटीज) द्वारे शेअर केली पाहिजे.

सध्या आयकर विभाग एआयएस (ॲन्युअल इन्फॉर्मेशन स्टेटमेंट) आणि फॉर्म २६–एएस च्या माध्यमातून तुमच्या प्रत्येक ट्रांजॅक्शनवर लक्ष ठेवून असतो. त्यामुळे आकडेवारीत फेरफार करण्यापेक्षा योग्य फॉर्म भरणे आणि तज्ज्ञांचा सल्ला घेणे हाच सर्वात सुरक्षित मार्ग आहे.

## मार्च महिना संपण्याआधी...

आर्थिक वर्ष २०२५–२६ समाप्त होण्यासाठी आता खूपच कमी वेळ उरला आहे. अशा परिस्थितीत जे करदाते जुन्या आयकर व्यवस्थेच्या (ओल्ड टॅक्स रिजीम) अंतर्गत कर भरतात, त्यांनी ३१ मार्चपूर्वी काही महत्त्वाच्या आर्थिक स्टेप्स उचलल्या पाहिजेत. वेळेत गुंतवणूक आणि पेमेंट पूर्ण केल्याने टॅक्समध्ये मोठी मदत मिळू शकते. आर्थिक सल्लागारांच्या मते, शेवटच्या क्षणाची घाई टाळण्यासाठी ही कामे आधीच पूर्ण करणे केव्हाही चांगले, कारण ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर तांत्रिक अडचणींमुळे व्यवहार पुढील आर्थिक वर्षात नोंदवले जाऊ शकतात आणि तुम्हाला टॅक्सचा लाभ मिळत नाही.

● **प्रथम तपासा ८०–सी ची मर्यादा**




सर्वात आधी हे पाहणे गरजेचे आहे की, आयकर अधिनियमाच्या कलम ८०–सी अंतर्गत मिळणाऱ्या १.५ लाख रुपयांपर्यंतच्या सवलतीपैकी किती उपयोग झाला आहे. अनेकदा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी म्हणजेच ईपीएफ, जीवन विमा प्रीमियम किंवा मुलांची ट्युशन फी यांसारख्या गोष्टी आधीच या मर्यादेत समाविष्ट असतात. जर या मर्यादेत अजून काही रक्कम शिल्लक असेल, तर ती ३१ मार्चपूर्वी मान्य गुंतवणूक पर्यायांमध्ये लावून पूर्ण केली जाऊ शकते.

● **टॅक्स सवलत**

कलम ८०–सी अंतर्गत अशा अनेक योजना आहेत ज्यामध्ये गुंतवणूक करून टॅक्स वाचवला जाऊ शकतो. यामध्ये पब्लिक प्रॉव्हिडंट फंड (पीपीएफ), नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट (एनएससी), सुकन्या समृद्धी योजना, सीनियर सिटीझन सेव्हिंग स्कीम आणि टॅक्स सेव्हिंग फिक्स्ड डिपॉझिट यांचा समावेश होतो. या योजनांमध्ये गुंतवणूक केल्याने केवळ टॅक्स सवलत मिळत नाही, तर हा सुरक्षित बचतीचा देखील एक उत्तम पर्याय मानला जातो.

● **ईएलएसएस आणि एनपीएस मधून अतिरिक्त फायदा**

इक्विटी लिंक्ड सेव्हिंग स्कीम म्हणजेच ईएलएसएस म्युच्युअल फंडाच्या माध्यमातून टॅक्स वाचवण्याचा एक लोकप्रिय मार्ग आहे. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ तीन वर्षांचा लॉक–इन पिरियड असतो, जो ८०–सी च्या इतर योजनांच्या तुलनेत सर्वात कमी आहे. याशिवाय, नॅशनल पेन्शन सिस्टम (एनपीएस) मध्ये गुंतवणूक करणाऱ्या करदात्यांना अतिरिक्त टॅक्स लाभ देखील मिळतो. आयकर अधिनियमाच्या कलम ८०–सीसीडी(१बी) अंतर्गत ५० हजार रुपयांपर्यंतच्या अतिरिक्त वजावटीचा लाभ घेता येतो. ही सवलत ८०–सी च्या १.५ लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा वेगळी असते.

● **आरोग्य विमा प्रीमियम आणि किमान गुंतवणूक**

आरोग्य विमा प्रीमियमचा भरणा करणे हा देखील टॅक्स बचतीचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. आयकर अधिनियमाच्या कलम ८०–डी अंतर्गत हेल्थ इन्शुरन्स प्रीमियमवर कर वजावटीचा लाभ मिळतो. जर ३१ मार्चपूर्वी प्रीमियम जमा केला नाही, तर त्या वर्षासाठी टॅक्स लाभ मिळणार नाही. तसेच, पीपीएफ, सुकन्या समृद्धी योजना आणि एनपीएस खात्यांमध्ये वार्षिक किमान योगदान देणे अनिवार्य असते. जर ही रक्कम वेळेवर जमा केली नाही, तर खाते निष्क्रिय होऊ शकते आणि त्याचा परिणाम टॅक्स लाभांवर होऊ शकतो.

## 'जॉईंट टॅक्स फायलिंग' काय आहे?

संसदेच्या अलिकडच्या अधिवेशनात आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी सर्वसामान्यांच्या खिशावरचा ताण कमी करण्यासाठी एक अत्यंत कल्पक आणि व्यावहारिक प्रस्ताव मांडला आहे. सध्याच्या कर रचनेत पती–पत्नीला दोन स्वतंत्र घटक मानले जाते. यामुळे अनेक मध्यमवर्गीय कुटुंबांवर कराचा अन्यायकारक बोजा पडतो. हा विसंगतपणा दूर करण्यासाठी त्यांनी 'संयुक्त प्राप्तिकर विवरण म्हणजेच जॉईंट टॅक्स फायलिंग ही संकल्पना मांडली आहे. यामुळे विशेषतः अशा कुटुंबांना मोठा दिलासा मिळू शकतो जिथे उत्पन्नाचे वाटप असमान आहे.




सध्याच्या नियमांनुसार, जर पती आणि पत्नी दोघेही प्रत्येकी १० लाख रुपये कमावत असतील, तर दोघांनाही वैयक्तिक कर सवलतींचा लाभ मिळतो आणि अनेकदा त्यांचा एकूण कर शून्य होतो. मात्र, जर एखाद्या कुटुंबात केवळ एकच व्यक्ती २० लाख रुपये कमवत असेल आणि दुसरी व्यक्ती काहीही कमवत नसेल, तर त्या कुटुंबाला सुमारे १.९२ लाख रुपये कर भरावा लागतो. राघव चड्ढा यांनी अधोरेखित केले की, दोन्ही प्रकरणांमध्ये कुटुंबाचे एकूण उत्पन्न २० लाख रुपये असूनही केवळ कर भरणाऱ्या व्यक्तींच्या संख्येमुळे हा मोठा फरक पडतो. ही तफावत दूर करण्यासाठी पती–पत्नीला एक 'आर्थिक घटक' मानून त्यांच्या एकत्रित उत्पन्नावर कर आकारला जावा, असा त्यांचा आग्रह आहे.


संयुक्त फायलिंगमध्ये हे उत्पन्न एकत्र मोजल्यास करपात्र रकमेचा भार विभागला जाईल आणि कमी उत्पन्न असलेल्या जोडीदाराच्या उरलेल्या कर सवलतीचा फायदा दुसऱ्याला मिळू शकेल. फ्रान्स, जर्मनी, अमेरिका आणि ब्रिटन यांसारख्या विकसित देशांमध्ये ही पद्धत आधीपासूनच यशस्वीपणे राबवली जात असल्याचा दाखलाही त्यांनी दिला. भारतात 'हिंदू अविभाजित कुटुंब' (एचयूएफ) आणि भागीदारी संस्थांना कर घटक मानले जाते, मग पती–पत्नीच्या लहान कुटुंबाला हा दर्जा का नसावा, असा मूलभूत प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

तज्ज्ञांच्या मते, हा बदल अनिवार्य न ठेवता ऐच्छिक स्वरूपात लागू केल्यास मध्यमवर्गीयांना मोठा फायदा होऊ शकतो. विशेषतः ज्या कुटुंबांचे एकत्रित उत्पन्न २४ लाख रुपयांपर्यंत आहे आणि जिथे उत्पन्नाचे स्रोत मर्यादित आहेत, तिथे यामुळे कराची बचत होईल. यामुळे कर चोरीला आळा बसेल आणि महिलांचा कर प्रक्रियेतील सहभाग वाढेल.

मात्र, ही सुधारणा दिसायला सोपी वाटत असली तरी तिची अंमलबजावणी करणे हे सरकारपुढील मोठे आव्हान असेल. यासाठी प्राप्तिकर विभागाचे सॉफ्टवेअर अपडेट करणे, नवीन कर स्तर (स्लॅब) निश्चित करणे आणि सवलतींच्या नियमांची फेररचना करणे यांसारखी तांत्रिक आव्हाने सरकारसमोर असतील.

## गुंतवणुकीचा 'डबेवाला' फॉर्म्युला

शेअर बाजारातील सध्याची घसरण पाहून अनेक गुंतवणूकदार अस्वस्थ झाले आहेत. मात्र, अशा डळमळीत काळात मुंबईच्या डबेवाल्यांची कार्यपद्धती डोळ्यांसमोर ठेवली, तर गुंतवणुकीचा खरा मार्ग सापडू शकतो. दररोज ५,००० डबेवाले सुमारे २ लाख टिफिन कोणत्याही चुकीशिवाय वेळेवर पोहोचवतात. पाऊस असो, रेल्वेचा उशीर असो किंवा उन्हाचा कडाका त्यांची सेवा खंडित होत नाही. त्यांच्या यशाचे रहस्य कोणतेही गुंतागुंतीचे तंत्रज्ञान नसून, स्वतःच्या 'सिस्टम'वर असलेला विश्वास आणि कमालीची शिस्त हे आहे. नेमका हाच सिद्धांत सध्याच्या पडत्या बाजारात गुंतवणूकदारांसाठी लागू होतो.



**बाजारातील अस्थिरता आणि गुंतवणूकदारांची मानसिकता**

मार्च २०२६ च्या आकडेवारीनुसार, 'बीएसई सेन्सेक्स' वर्षाच्या सुरुवातीपासून १० टक्क्यांहून अधिक घसरला आहे, तर 'निफ्टी आयटी' निर्देशांक थेट २३ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. जागतिक स्तरावर अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमती २०२२ च्या युद्धकाळातील पातळीवर पोहोचल्या आहेत. अशा नकारात्मक बातम्यांमुळे सामान्य गुंतवणूकदार घाबरून आपला पोर्टफोलिओ विकण्याचा विचार करू लागतो. मात्र, मानवी स्वभावानुसार आपल्याला नफ्यापेक्षा तोट्याचे दुःख दुप्पट जाणवते, ज्याला अर्थशास्त्रात 'लॉस ॲव्हर्जन' म्हटले जाते. इतिहास सांगतो की, १९८० ते २०२५ दरम्यान सेन्सेक्समध्ये १० टक्के किंवा त्याहून अधिक घसरण अनेकदा झाली आहे; तरीही ४५ पैकी ३६ वर्षे बाजाराने सकारात्मक परतावाच दिला आहे.

**संयमातून संपत्तीनिर्मिती**

गुंतवणूक म्हणजे टी–२० सामना नसून तो एक 'टेस्ट मॅच' आहे, जिथे प्रत्येक चेंडूवर फटका मारण्यापेक्षा खेळपट्टीवर टिकून राहणे महत्त्वाचे असते.' बाजाराची घसरण ही संपत्ती निर्मितीच्या प्रक्रियेचाच एक भाग आहे. जेव्हा बाजार खाली येतो, तेव्हा 'एसआयपी'च्या माध्यमातून गुंतवणूकदाराला कमी किमतीत जास्त युनिट्स खरेदी करण्याची संधी मिळते. जर या काळात घाबरून गुंतवणूक थांबवली, तर स्वस्त दरात खरेदी करण्याचा हा मुख्य फायदाच नष्ट होतो. २००३ ते २०२२ या काळातील आकडेवारीनुसार, जे गुंतवणूकदार बाजाराच्या चढ–उताराला घाबरून बाहेर पडले, त्यांना शिस्तबद्ध गुंतवणूकदारांच्या तुलनेत कित्येक पटीने कमी परतावा मिळाला आहे.

विदेशी गुंतवणूकदार विक्री करत असले तरी, भारतीय गुंतवणूकदारांचा विश्वास अजूनही कायम आहे. दरमहा २९,००० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक 'एसआयपी'च्या माध्यमातून बाजारात येत आहे. भारताचा विकासदर २०२६ मध्ये ७.५ टक्क्यांच्या आसपास राहण्याचा अंदाज असून महागाई नियंत्रण कक्षेत आहे. २०२० मधील कोरोनाची मोठी घसरण असो किंवा २००८ चे जागतिक आर्थिक संकट, प्रत्येक मोठ्या घसरणीनंतर बाजाराने नवी उच्चांकी पातळी गाठली आहे. त्यामुळे डबेवाल्यांप्रमाणे आपल्या गुंतवणुकीच्या पद्धतीवर विश्वास ठेवा, शिस्त पाळा आणि मैदानाबाहेर न जाता खेळत राहा. तुमचा परतावा योग्य वेळी तुमच्यापर्यंत नक्कीच पोहोचेल.




आनंद संस्कार शिक्षा अभियानांतर्गत मुलांचे शहरात विविध ठिकाणी पथनाट्य सादरीकरण झाले.

## आनंद संस्कार शिक्षा अभियानांतर्गत मुलांचे शहरात विविध ठिकाणी पथनाट्य सादरीकरण

नगर – राष्ट्रसंत आचार्य सम्राट गुरुदेव आनंदऋषीजी महाराज यांच्या आशीर्वादाने आशीर्वादाने आणि प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने सुरू झालेल्या आनंद संस्कार शिक्षा अभियाना तर्फे व्यापक समाज जागृती करण्यात येत आहे. या अंतर्गत अभियानातील विद्यार्थ्यांनी 'अपरिग्रह आणि अस्तेय' म्हणजे खऱ्या आनंदाचा मार्ग या पथनाट्याचे सादरीकरण शहरात विविध ठिकाणी केले. नगरकरांनी या पथनाट्याला प्रतिसाद देत कलाकारांचे कौतुक केले

रविवारी सकाळी प्रोफेसर कॉलनी, सावेडी येथे पथनाट्य सादरीकरणाला सुरुवात झाली. यानंतर दिल्लीगेट, पुणे बसस्थानक, माळीवाडा महात्मा फुले चौक येथे पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. संकलक व दिग्दर्शक शिवाजी नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली दिया मुनोत, हर्षदा मुनोत, राजुल बोरा, सर्वम चोपडा, माही भंडारी, दिया पटवा, रिद्धी मेहेर, प्रतीक्षा भंडारी, काव्या भंडारी, रिया चोपडा, धन्वी, आरोही गुगळे, साक्षी पटवा, काव्या बोरा, भाविक बोरा या कलाकारांनी पथनाट्य सादर केले.

आनंद संस्कार शिक्षा अभियान मागील अनेक वर्षांपासून चालवले जाते. क्रमिक शिक्षणाला संस्कारांची जोड देऊन मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला भर दिला जातो. धार्मिक शिक्षण, भारतीय परंपरा, साधू संतांची शिकवण, चारित्र्य संपन्नता, राष्ट्र निष्ठा, कुटुंबाप्रती आदरभाव, मोठ्यांचा सन्मान, सकारात्मक दृष्टिकोन अशा विविध बाबींवर अभियानात मार्गदर्शन केले जाते.

# परसबाग निर्मिती स्पर्धेत मनपा ओंकारनगर शाळेला अहिल्यानगर शहरातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक

### शिक्षक व विद्यार्थ्यांच्या परिश्रमातून पटकावले ११००० रुपयांचे पारितोषिक



नगर – प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत शालेय परसबाग निर्मिती स्पर्धेत महानगरपालिका प्राथमिक शाळा ओंकारनगर केडगाव अहिल्यानगर शाळेला अहिल्यानगर शहरातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे.

महापालिका, जिल्हा परिषद, खाजगी प्राथमिक, माध्यमिक अशा १३५ शाळा या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. मनपा ओंकारनगर शाळेला अहिल्यानगर शहरातून प्रथम क्रमांकाचे ११००० रुपयांचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. तसेच शाळेची जिल्हास्तरीय शालेय परसबाग निर्मिती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ओंकारनगर शाळेत मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे व शाळेतील विद्यार्थी यांच्या मदतीने गेल्या दहा वर्षांपासून शाळेत परसबाग फुलवली आहे. यासाठी सुवर्णराज ट्रेडर्स, पित्रोडा फर्निचर, सहज फाऊंडेशन अहिल्यानगर, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर मिडटाऊन, लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगर मिलेनियम यांचेही सहकार्य मिळाले आहे.

ओंकारनगर शाळेत शेवगा, कढीपत्ता, लिंबू, वांगी, मिरची, टोमॅटो, कोबी, फ्लॉवर, पालक, अळू, बटाटा, कोथिंबीर, कांदा, लसूण, दोडका, हळद अशा विविध पालेभाज्यांची लागवड करण्यात आलेली आहे. तसेच सीताफळ, रामफळ, आंबा, चिकू, पेरू, फणस, आवळा, चिंच अशी विविध फळझाडे, विविध औषधी वनस्पती, विविध फुलझाडे यांची लागवड विद्यार्थ्यांच्या मदतीने करण्यात आलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध रोपांची व झाडांची माहिती प्रत्यक्षपणे मिळाली आहे. विद्यार्थ्यांना कोणत्या भाजीतून कोणते पोषक घटक मिळतात याचीही माहिती झाली आहे. तसेच जल व्यवस्थापन, कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प, पाण्याचा पुनर्वापर, टाकाऊ पदार्थांपासून खतनिर्मिती, इको क्लब उपक्रम, पर्यावरणविषयक जागृती इत्यादी उपक्रम शाळेत राबविण्यात येतात. तसेच परसबागेतून मिळणाऱ्या भाज्या शालेय पोषण आहारासाठी वापरल्या जातात. तसेच विद्यार्थी शाळेतील विविध फळांचा आस्वाद घेतात. शाळेतील परसबागेत सेंद्रिय पद्धतीने पिकविलेला भाजीपाला बाल आनंद मेळाव्यात विक्रीसाठी ठेवण्यात येतो. त्याचप्रमाणे शाळेत परसबागेसाठी लोकसहभागातून ५५००० रुपये खर्च करून बोअरवेल घेण्यात आलेला आहे.

शालेय परसबाग निर्मितीसाठी ओंकारनगर शाळेला अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, शालेय पोषण आहार समन्वयक ज्ञानेश्वर कुटे, केंद्र समन्वयक चंद्रशेखर साठे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे.

महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, नगरसेवक अमोल येवले, नगरसेवक विजय पठारे, नगरसेविका सुनिताताई कांबळे, नगरसेविका वर्षाताई काकडे, प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा पल्लवी भुजबळ, उपाध्यक्षा दुर्गा घेवारे यांनी शाळेतील शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



महानगरपालिका शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर महासंघ, न.पा, मनपा शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सांस्कृतिक स्पर्धेत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेने इयत्ता पहिली ते चौथी च्या गटात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

## मनपा सांस्कृतिक स्पर्धेत बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेचा प्रथम क्रमांक

नगर – अहिल्यानगर महानगर पालिका शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर महासंघ, न.पा, मनपा शिक्षक संघ अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सांस्कृतिक स्पर्धेत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेने इयत्ता पहिली ते चौथीच्या गटात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

माऊली संकुल सभागृहात २७ एप्रिल रोजी या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत अहिल्यानगर शहरातील पहिली ते चौथी च्या गटामध्ये १६ तर पाचवी ते सातवी च्या गटात १५ शाळांनी या संस्कृतिक स्पर्धेत सहभाग घेतला होता. महाराष्ट्राची लोकधारा हा विषयावर असणाऱ्या या नृत्य स्पर्धेत बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी देवीचा गोंधळ हा नृत्य आविष्कार सादर केला. या नृत्याने प्रेक्षक आणि परीक्षकांना मंत्रमुग्ध केले. या नृत्याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जाहीर करण्यात आले.

या नृत्यामध्ये प्रशालेतील पहिली ते चौथीच्या गटात खुरंगे राजवी, पवार कृपा, पंडित आर्या, गुंजाळ श्रेया, शिंदे शर्वरी, मोरे शर्वरी, गोरे श्रेया, ढवळे रितीशा, नागुलपेल्ली देवांशी, जाधव वीरा, साठे वसुधा, श्रीराम शिवन्या, कोठुळे जान्हवी, पवार वंशिका, थोरवे काव्यांजली, साळुंके वैष्णवी, मोकाटे स्वरांजली, गवांडे वेदश्री, सोनवणे अनिशा, बलदवा शरन्या, पाटील अद्रिका, बनसोडे आरोही, साळवे जयेश, भिंगारदिवे वैभवी, भुजबळ अर्णव या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या विद्यार्थ्यांना अनुभव चव्हाण आणि सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

यशस्वी विद्यार्थी, मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया व प्रशालेतील सर्व शिक्षक यांचे संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सह कार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, प्रशालेच्या शाला समितीचे सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे. या स्पर्धेचे परीक्षण अभिजित शिर्के, मानसी आडेप, रसिका कायगावंकर यांनी केले होते.

## 'राज्य निवड चाचणी व अजिंक्यपद पुरूष गट कबड्डी'साठी अहिल्यानगरचा संघ सज्ज, सराव शिबीराचा झाला समारोप



२ एप्रिल पासुन नाशिक येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद पुरूष गटाच्या कबड्डी स्पर्धेसाठी अहिल्यानगरच्या संघाने दहा दिवस सराव केला. त्यांच्या सराव शिबीराचा आज समारोप झाला.

नगर – नाशिक येथील सिन्नर येथे २ ते ६ एप्रिल या कालावधीत होणाऱ्या ७३ व्या राज्य निवड चाचणी व अजिंक्यपद पुरुष गटाच्या स्पर्धेसाठी अहिल्यानगर कबड्डी संघाच्या सराव शिबीराचा समारोप वाडिया पार्क येथे करण्यात आला.

अहिल्यानगर संघाचे सराव शिबीर वाडिया पार्क येथे २० ते ३० मार्च या दरम्यान आयोजीत करण्यात आले होते. त्याचा समारोप उद्योजक अमोल गाडे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी क्रिडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, माजी क्रिडा अधिकारी अजय पवार, कबड्डी संघटनेचे सचिव प्रा.शशिकांत गाडे, खजिनदार प्रकाश बोरूडे, उद्योजक संतोष घोरपडे, संघाचे प्रशिक्षक शंतनु पांडव, विनायक भुतकर, अजय पवार, सचिन सप्रे, कृष्णा लांडे आदि उपस्थित होते.

क्रिडा अधिकारी अजय पवार यांनी महापालिकेचा गुलमोहोर रोड येथील साडे तीन एकरचा भूखंड क्रिडागंणासाठी भाडेतत्त्वावर कराराने देण्याची मागणी केली. याबाबतचा ठराव महापालिकेला सर्व क्रिडा संघटनेच्या वतीने देण्यात येणार आहे.

यावेळी अमोल गाडे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संघाला शुभेच्छा दिल्या.

### असा आहे अहिल्यानगरचा संघ

ऊजवी चढाई –सौरभ राऊत , अशिष यादव , गणेश मांजरे, डावी चढाई – अदित्य शिंदे, शिवम पटारे, वेदांत उंदरे, उजवा मध्य रक्षक– सोमनाथ बेडके, प्रशांत उपळकर, डावा मध्य रक्षक– अजित पवार , अशिष वाघ, उजवा कोपरा रक्षक– शंकर गदई, संकेत खलाटे, डावा मध्य रक्षक– अभिषेक पवार , राहुल घनवटे,

### अहिल्यानगर संघाला सलग तीनदा अजिंक्यपदाची हुलकावणी

गेल्या काही वर्षांपासून आपल्या अतुलनीय कामगिरीने अहिल्यानगरच्या कबड्डी संघाने मुंबई, पुणे, ठाणे यांची मक्तेदारी मोडत ६९ व्या स्पर्धेत अजिंक्यपद पटकावले. त्यांनतर सलग तीन स्पर्धामध्ये नगरच्या संघाला उपविजेता पदावर समाधान मानावे लागले. यंदा पुन्हा नगरच्या संघाला अजिंक्यपद मिळण्याची संधी आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यासाठी पावसाचा 'ऑरेंज' व 'येलो' अलर्ट जारी; नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

नगर – भारतीय हवामान खात्याने अहिल्यानगर जिल्ह्यात ३० व ३१ मार्च या कालावधीत तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह वादळे, सोसाट्याचा वारा व गारपीटीची शक्यता व्यक्त केली असून जिल्ह्यासाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. तसेच १ व २ एप्रिल या कालावधीत वीजांच्या कडकडाटासह वादळे, मध्यम पाऊस व वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने 'येलो अलर्ट' घोषित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

मेघगर्जना, वीजा चमकणे किंवा वादळी वारे असताना झाडाखाली उभे राहू नये; सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. वादळाच्या वेळी कोणतेही विद्युत उपकरण वापरू नये व विद्युतवाहक वस्तूंपासून दूर राहावे. मोकळे मैदान, टॉवर्स, विद्युत खांब, ट्रान्सफॉर्मर, धातूचे कुंपण यांजवळ थांबू नये. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) परिसरात थांबणे टाळावे. वीजा चमकत असताना उघड्यावर असल्यास गुडघ्यावर बसून शरीराचा जमिनीशी संपर्क कमी ठेवावा.

धरण, नदी किंवा कालव्यांच्या पाण्यात उतरू नये; धोकादायक ठिकाणी सेल्फी घेणे टाळावे. शेतकऱ्यांनी पाऊस व गारपीट लक्षात घेऊन शेतीमालाचे संरक्षण व साठवणूक करावी.बाजार समितीत आणलेला माल सुरक्षित ठेवण्याची खबरदारी घ्यावी.जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवावे. नागरिकांनी वादळी वारे, वीज, पाऊस व गारपीट यापासून स्वतःचे व जनावरांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नजीकच्या पोलीस स्टेशन किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथे टोल फ्री क्रमांक १०७७ तसेच ०२४१–२३२३८४४ अथवा २३५६९४० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## निवृत्त कर्मचाऱ्याला भररस्त्यात लोखंडी रॉडने बेदम मारहाण

नगर –शहरातील बालिकाश्रम रोडवरील प्रणव विहार सोसायटीच्या गेटसमोर एका अनोळखी तरुणाने ७३ वर्षीय सेवानिवृत्त कृषी कर्मचाऱ्याला लोखंडी रॉडने बेदम मारहाण केल्याची घटना २८ मार्च रोजी सायंकाळी ७.३० च्या सुमारास घडली आहे. एकनाथ हरिभाऊ गायकवाड असे जखमी वृद्धाचे नाव असून, या हल्लयात त्यांच्या पायाचे हाड मोडले आहे.

फिर्यादी गायकवाड हे रात्रीच्या सुमारास काम आटोपून रिक्षाने घरी परतत असताना घराच्या गेटवर एक अज्ञात तरुण उभा होता. 'येथे का उभा आहेस?' अशी विचारणा केली असता, त्या तरुणाने रागाच्या भरात तेथेच पडलेला लोखंडी रॉड उचलून गायकवाड यांच्यावर हल्ला केला. यावेळी झालेल्या झटापटीत गायकवाड खाली पडले असता, आरोपीने त्यांच्या डाव्या पायावर आणि हातावर जोरात प्रहार केले.

गायकवाड यांच्या ओरडण्याने त्यांची पत्नी शोभा गायकवाड आणि शेजारी मदतीला धावून आले, मात्र तोपर्यंत अंदाजे २२ ते २५ वर्षे वयाचा तरुण रॉडसह पसार झाला. जखमी गायकवाड यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात व त्यानंतर खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून शस्त्रक्रिया करावी लागली आहे. याप्रकरणी गायकवाड यांनी २९ मार्च रोजी दिलेल्या जबाबानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## शेतातून ८०० फूट कॉपर केबलची चोरी

नगर – नगर तालुक्यातील अरणगाव शिवारात अज्ञात चोरट्यांनी शेतातील मोटरची कॉपर केबल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सर्जेराव निराजी माने (वय ६८, रा. बाबुर्डी घुमट, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

माने हे सेवानिवृत्त असून शेती व्यवसाय करतात. २५ मार्च रोजी सायंकाळी सात वाजेपासून ते २६ मार्च रोजी पहाटे चार वाजेच्या दरम्यान अरणगाव शिवारातील शेतगट क्रमांक १२३ मध्ये ही चोरीची घटना घडली. अज्ञात चोरट्यांनी फिर्यादी व त्यांच्या शेजाऱ्यांच्या शेतातील सुमारे ८०० फूट लांबीची मोटरची कॉपर वायर असलेली केबल चोरून नेली. या केबलची किंमत अंदाजे ३२ हजार रूपये इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे. ही बाब लक्षात आल्यानंतर २८ मार्च रोजी सकाळी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अंमलदार नितीन गांगुर्डे अधिक तपास करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## सीए परीक्षेत प्रणव निलांगे उत्तीर्ण



नगर – येथील प्रणव निलांगे हा सीए परिक्षेत उत्तीर्ण झाला आहे. नगर जिल्ह्यामधील कर्जत, ता. जि. अहिल्यानगर येथील संजय निलांगे (सनी टेलर्स) यांचा तो मुलगा आहे. तसेच त्यांची कन्या सौ. ऋतुजा निलांगे (सध्या पुणे, पुनावळे) ६ वर्षापूर्वी सीए झाली आहे.

# डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे विद्यापीठ व हिंद सेवा मंडळ यांच्यात 'सामंजस्य करार'



ज्येष्ठ उद्योजक प्रमोद चौधरी, डी.इ.एस.पुणे विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ.रवींद्र आचार्य व हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी हिंद सेवा मंडळ व डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचालित डी.इ.एस. पुणे विद्यापीठ यांच्यात सामंज्यस करार केला.

नगर – शंभरहून अधिक वर्षांची ऐतिहासिक परंपरा असलेले हिंद सेवा मंडळ व १४० वर्षांची वैभवशाली परंपरा लाभलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचालित डी.इ.एस. पुणे विद्यापीठ या दोन शैक्षणिक सस्थांमध्ये एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक सामंजस्य करार झाला आहे. या करारानुसार परिमल व प्रमोद चौधरी फौंडेशन यांच्या सहकार्याने अहिल्यानगरमधील दादा चौधरी विद्यालय व मराठी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी मोठी मदत होणार असून विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा व व्यक्तिमत्व विकासाच्या अधिक संधी उपलब्ध होणार आहेत. उद्योजक प्रमोद चौधरी, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक व डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र आचार्य यांनी नुकत्याच ह्या शैक्षणीक करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

पुणे येथील डी.इ.एस.पुणे विद्यापीठाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजेश इंगळे, शिक्षण–विद्या विभागाचे प्रमुख डॉ.जयंत कुलकर्णी, प्राज फौंडेशनचे आर्थिक सल्लागार दत्तात्रय निंबोळकर व प्रकल्प समन्वयक सानिका जोशी, दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई, प्राथमिक शाळेचे चेअरमन मधुसुदन सारडा, उपक्रमाचे समन्वयक अविनाश देशमुख व केदार तापीकर, विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. संजीवनी शेळके, वरुण सारडा, दादा चौधरी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले, शिक्षक दीपक शिंदे व अजय महाजन उपस्थित होते.

उद्योजक प्रमोद चौधरी म्हणाले, ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या या संस्थांमधील सामंजस्य करार भविष्यात निश्चितच फलदायी ठरेल आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवे दार उघडले जाईल. अनंत देसाई यांनी पुढाकार घेतल्याने या कराराला मूर्तस्वरूप प्राप्त झाले. यामुळे दादा चौधरी विद्यालयातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावून त्यांना दर्जेदार शिक्षण मिळेल. भविष्यातही हिंद सेवा मंडळाच्या कार्याला माझे पूर्ण सहकार्य राहील.

डॉ.रवींद्र आचार्य म्हणाले, प्रमोद चौधरी हे कायमच डी.इ.एस.पुणे विद्यापीठ आणि हिंद सेवा मंडळाला सहकार्य आहे. या नव्या प्रयत्नामुळे शाळेचा शैक्षणिक दर्जा नक्कीच उंचावेल. शाळेकडे उत्साही अध्यापकांची चांगली फळी असून नवनवीन प्रयोगांद्वारे आम्ही त्यांच्याच माध्यमातून हा प्रयोग यशस्वीपणे राबवू शकू. प्रशालेच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीची एक दीर्घकालीनयोजना आम्ही हिंद सेवा मंडळाचे व्यवस्थापन आणि शिक्षकांच्या मदतीने बनवू आणि त्याच्या कार्यवाहीसाठी प्रशालेला पूर्ण सहकार्य करू. अनेक आव्हाने पेलणाऱ्या मराठी माध्यमाच्या शाळेला पुन्हा पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्याचा हा पहिलाच प्रयोग आहे.

प्रा.शिरीष मोडक म्हणाले, या सामंजस्य करारासाठी उद्योजक प्रमोद चौधरी यांचे सहकार्य लाभले आहे. डी.इ.एस. पुणे विद्यापीठासारखी देशात नावाजलेली संस्था नगरमध्ये येऊन हिंद सेवा मंडळाला शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सहकार्य करते आहे हे नगरमध्ये प्रथमच घडले आहे आणि याचे महत्व अनन्यसाधारण आहे. संस्था म्हणून आमच्यासाठी ही अभिमानास्पद घटना आहे. दादा चौधरी विद्यालयातील हा प्रयोग यशस्वी होईलच आणि त्यानंतर असाच प्रयोग हिंद सेवा मंडळाच्या उर्वरित सर्व शाळांमध्ये राबविण्याची आमची योजना आहे'.

डॉ.जयंत कुलकर्णी म्हणाले, नव्या आव्हानांना सामोरे जात मराठी माध्यमाच्या शाळा टिकण्यासाठी अमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. यासाठी उपक्रम ाधारित शिक्षण, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास, त्याला व्यावसायिक शिक्षणाची जोड, कौशल्य वर्धन, शिक्षकांची अधिक सकारात्मक मानसिकता, पालकांचा सहभाग या सर्व गोष्टी शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी अत्यावश्यक आहेत. यासाठीच डी.इ.एस.पुणे विद्यापीठ, उद्योजक प्रमोद चौधरी यांच्या सहकार्याने हिंद सेवा मंडळाबरोबर काम करणार आहे. यामध्ये दीर्घकालीन आराखडा तयार करून अंत:प्रेरकाची भूमिका घेऊन नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर प्रशालेच्या गुणवत्ता वाढीच्या या कामाकडे आम्ही सामाजिक जबाबदारीचा भाग म्हणून पाहणार आहोत.

प्रास्ताविकात अनंत देसाई म्हणाले, दादा चौधरी विद्यालयाला गत–वैभव प्राप्त होण्यासाठी हा सामंजस्य करार निश्चितपणे एक महत्त्वचा टप्पा ठरणार आहे. शाळेला चांगल्या सोयीसुविधा मिळाव्यात यासाठी उद्योजक प्रमोद चौधरी वेळोवेळी सहकार्य करीत आहेत.आता शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी डी.इ.एस.पुणे विद्यापीठाचे पाठबळ आम्हाला मिळाले आहे. त्यामुळे भविष्यात या शाळेमधून आदर्श व परिपूर्ण व्यक्तिमत्वाचे विद्यार्थी बाहेर पडतील.' कराराच्या यशस्वितेसाठी हिंद सेवा मंडळाचे सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा व ब्रिजलाल सारडा यांच्यासह संचालकांचे सहकार्य लाभले.

